परस्परं भावयन्तः
म प्र
मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र
# हितगुज
अंक १४० ✿ कार्याध्यक्ष : श्री. विजय मराठे ✿ डिसेंबर २०२४
Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

# संवाद कुलबांधवांशी

**मराठे कुलबांधव व भगिनींना सादर प्रणाम**

आपल्या 'हितगुज'चा डिसेंबर २०२४ चा अंक आपणास उपलब्ध करून देताना आनंद होत आहे.

सुरुवातीला एक महत्त्वाची नोंद आपण करून घ्या. आपल्या 'हितगुज'च्या संपादिका डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे यांनी गेली बरीच वर्षे उत्तम काम केले व आपणांस स्वतःच्या उत्तम लेखनासह इतरही लेखकांना संधी देऊन त्यांचे लेखन आपल्यासाठी उपलब्ध करून दिले. आता तांत्रिक गोष्टी खूप असल्याने व वयोमानाप्रमाणे त्यांनी थांबायचे ठरवले असल्याने आता नविन संपादकांचा शोध आपण सुरू केला आहे. मात्र अद्याप कोणी जबाबदारी न घेतल्याने मी व कार्याध्यक्ष श्री. विजय मराठे यांनी असे ठरवले की थांबून चालणार नाही. तेव्हा आपण अंक चालू ठेवू व संपादकांचा शोधही चालू ठेवू. तेव्हा आपणा सर्वांना एक आवाहन करत आहे की आपल्या वाचकांपैकी अथवा आपल्या ओळखीच्या मराठे परीवारापैकी कोणीही यासाठी तयार असेल तर त्वरित संपर्क साधावा.

मंडळी आपले कणकवली येथील अखिल भारतीय कुलसंमेलन होऊन आता जानेवारी मध्ये एक वर्ष पूर्ण होत आहे. आता पुढील संमेलनासाठी कोणी जबाबदारी घ्यायला तयार असेल त्यांनी आमच्याशी संपर्क साधावा.

'हितगुज'साठी दर्जेदार लेखनाची कायमच आवश्यकता असते तेव्हा आपण आपले लेखन आवर्जून पाठवा.

आपले प्रतिष्ठान आता पन्नाशीकडे वाटचाल करीत आहे तेव्हा जर आपणास ते आणखी चांगल्या प्रकारे चालावे असे वाटत असेल तर त्यासाठी आपला सहभाग आवश्यक आहे. तेव्हा ज्यांना मनापासून काम करण्याची इच्छा असेल त्यांनी लगेच संपर्क साधावा.

या अंकामध्ये आपण विविध लेखकांनी लिहिलेले लेख छापत आहोत तसेच आपले गोवा येथील जेष्ठ सदस्य श्री. कालिदास मराठे यांनी अथक प्रयत्न करून मिळवलेले सुधाकर मराठे यांचे भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' या कादंबरीवर लिहिलेले बीजभाषण आपणास उपलब्ध करून दिले आहे. त्यांचे मनापासून धन्यवाद. याचबरोबरीने त्यांनी स्वतः नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यावरील जी मते व्यक्त केली आहेत तीही या अंकामध्ये देत आहोत. याचबरोबरीने आपले उत्साही लेखक श्री. संजय मराठे, श्री. गिरीश जाखोटिया असे सर्वांचेच उत्तम लेखन आपणास उपलब्ध करून दिले आहे.

विविध विषयांवर लिखाण असले की विचारांना चालना मिळते. म्हणूनच आपणही लिहिते व्हा या आवाहनासह आता थांबतो.

सर्वांना २०२५ या नवीन वर्षाच्या खूप खूप शुभेच्छा.

**– श्री. हेमंत अरुण मराठे**
कार्यवाह, मराठे प्रतिष्ठान

कार्याध्यक्ष : श्री. विजय मराठे • दूरध्वनी : ९४२३०११९४९
• ई–मेल : hitguj@marathepratishthan.org
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई – ४०००३१

# ‘मराठे प्रतिष्ठान’ची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

• विजय मराठे, कार्याध्यक्ष मराठे प्रतिष्ठान

भ्रमणध्वनी : ९४२३०११९४९

‘मराठे प्रतिष्ठान’ची ४२वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ रोजी ईंदिरा मोरेश्वर सभागृह, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती.

सर्व सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना व्हॉट्सप, फेसबुक व ईमेल अशा विविध सोशल मीडिया मार्फत पाठवली होती. त्यानुसार पुणे शाखा त्याचे योग्य ते नियोजन करण्यात यशस्वी झाली.

ईंदिरा मोरेश्वर सभागृहात ठीक ९.४५ वाजता पुणे शाखेचे कार्यकारी मंडळातील सदस्य उपस्थित होते. सभेची सर्वसाधारण तयारी करण्यात आली होती. नोंदणी कक्षात चंद्रशेखर, सौ प्राजक्ता, मंजिरी, अश्विनी, अंजली उपस्थित होते व आलेल्या प्रत्येक सभासदांस चाफ्याचे फुल देऊन स्वागत करत होते. सभासद आपली नोंद करून चहापानानंतर आसनस्थ होत होते.

ठीक १०.३० वाजता सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली. सौ अश्विनी यांनी सभागृहात स्थानापन्न झालेल्या सर्व सभासदांचे स्वागत केल्यानंतर सभेची सुत्र ‘मराठे प्रतिष्ठान’चे कार्यवाह श्री. हेमंत यांचेकडे सुपूर्द केली.

व्यासपीठावर ‘मराठे प्रतिष्ठान’चे विश्वस्त श्री. दत्तात्रेय मराठे, कार्याध्यक्ष विजय, कोषाध्यक्ष अनंतराव, कार्यवाह श्री. हेमंत स्थानापन्न झाले.

सर्व प्रथम मागील वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर ज्या व्यक्तींचे दु:खद निधन झाले अशा ज्ञात व अज्ञात सभासदांस भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यक्रम पत्रिकेतील क्रमानुसार सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. अध्यक्षांची निवड करण्यात आली तसेच अध्यक्षांनी उपस्थित सभासदांचे स्वागत करून सभेच्या कामकाजास सुरुवात करण्याची अनुमती दिली.

कार्यवाह श्री. हेमंत यांनी ४१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचल्यावर त्याला मंजूरी देण्यात आली.

३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षांचा अहवाल, जमाखर्च, ताळेबंद तसेच २०२४-२०२५चे अंदाजपत्रक कोषाध्यक्ष श्री. अनंत राव यांनी सभेसमोर सादर केले त्यावर साधकबाधक चर्चा करण्यात आली व मंजुर करण्यात आला.

आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी लेखापरीक्षक म्हणून श्री. अमोल दांडेकर यांची नेमणूक करण्यात आली.

‘मराठे प्रतिष्ठान’च्या भावी कार्यक्रमासंदर्भात बऱ्यापैकी चर्चा झाली. काही सभासद काम करण्यास इच्छुक आहेत असे निदर्शनास आले.

‘मराठे प्रतिष्ठान’च्या वतीने २०२३-२०२४ आर्थिक वर्षांत उपलब्ध अर्जांची योग्य ती शहानिशा करून वैद्यकीय व शैक्षणिक मदत जवळपास १०००००/= संबंधितांच्या खात्यावर कोषाध्यक्षांनी जमा केली.

‘मराठे प्रतिष्ठान’ दरवर्षीच माध्यमिक व उच्चमाध्यमिक परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी-विद्यार्थीनींचा गुणगौरव करत असते. या वर्षी ६ जण आपल्या पालकांसमावेत उपस्थित होते. त्यांना आपले विश्वस्त श्री. दत्तात्रेय यांचे हस्ते खालील पारितोषिक वितरण करण्यात आली.

त्याची नावे खालील प्रमाणे.

एकूण ७ गुणपत्रिका आल्या होत्या.

**एस.एस.सी. ५ जण.**

१) चि. खांबेटे निल प्रशांत, पुणे.
एस.एस.सी. उत्तीर्ण
गुण ४७९/५०० (९५.८०%.) रु. १०००/-
कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक सर्वोत्तम गुण ५००/-
एकुण रु. १५००/-

२) कु. मंयक मनिष मराठे, पुणे.
सी.बी.एस.सी. उत्तीर्ण.
गुण ४६९/५०० (९३.८०%) रु. १०००/-

३) कु. तेजश्री पुष्कराज मराठे, पुणे
सी.बी.एस.सी. उत्तीर्ण.
गुण ४५२/५०० (९२.४०%) रु. १०००/-

४) चि. तन्मय गणेश मराठे, शिरूर पुणे.
एस.एस.सी. उत्तीर्ण
गुण.४४७/५०० (८९.९०%). रु. ८००/-

५) चि. जहान सौरभ गुप्ता, मुंबई.
सी.बी.एस.सी. उत्तीर्ण
गुण ४४१/५०० (८८.२०%). रु. ८००/-

**एच.एस.सी. २ जण**

१) चि. लालीत्य सुधन्वा मराठे, संभाजीनगर.
एच.एस.सी. उत्तीर्ण.
गुण ५६४/६०० (९४%) रु. १०००/-
कै. अनिता खांबेटे स्मृती पारीतोषिक. सर्वोत्तम गुण रु ६००/- एकूण रु.१६००/-

२) कु. श्रीया अजित मराठे, पुणे
एच.एस.सी. उत्तीर्ण.
गुण ५०५/६०० (८४.१७%) रु. ८००/-

२०२४ घरगुती श्रीगणेश उत्सव सजावट स्पर्धेत १८ कुलबांधवांनी सहभाग घेऊन उत्तम प्रतिसाद दिल्याबद्दल कुलबांधवांचे मनःपुर्वक हार्दिक अभिनंदन.

त्या स्पर्धेत खालील स्पर्धक विजयी झाले.

- प्रथम पारितोषिक रु. १००१/-
  श्री. भानुदास शंकर मराठे, बडोदा.
- द्वितीय पारितोषिक रु. ७५१/-
  ज्ञायाधीष श्री. कौस्तुभ नागेश मराठे, गेवराई.
- तृतीय पारितोषिक रु. ५०१/-
  श्री. पुरुषोत्तम वामन मराठे, कल्याण.

आपल्या एका वयोवृद्ध सभासदांकडून वैद्यकीय मदत मिळण्याकरता अर्ज दाखल झाला होता त्या संदर्भात एक निवेदन आपण हितगुज समूहावर पाठविल्यानंतर काही कुलबांधवांनी संबंधितांच्या खात्यावर यथायोग्य रक्कम जमा केली हा आपल्या समुहाचा उपयोग.


आभारप्रदर्शन सौ. अंजली, अध्यक्षा पुणे शाखा यांनी केले. त्यानंतर संपूर्ण वंदेमातरम श्री. पुष्कराज यांनी सादर केल्यानंतर सर्व सभासदांकडून गोखले मराठे असोसिएट यांच्या सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला. वार्षिक सर्वसाधारण सभेत ६० सभासद उपस्थित होते हे विशेष.

'मराठे प्रतिष्ठान' पुणे शाखेच्या अध्यक्षा, कार्यवाह, कोषाध्यक्ष व कार्यकारी मंडळातील सदस्य यांनी सर्व नियोजन अतिशय छान केल्याबद्दल मनापासून धन्यवाद.

♦

## घरगुती गणेश सजावट स्पर्धा २०२४


प्रथम क्रमांक : श्री. भानुदास मराठे, बडोदा


तृतीय क्रमांक : श्री. पुरुषोत्तम मराठे, कल्याण


द्वितीय क्रमांक : श्री. कौस्तुभ नागेश मराठे, गेवराई

# आजच्या सामजिक परिपेक्षात, कॅटेलेटीक एजंट्स आणि आयसोटोप्स

◆ संजय रामचंद्र मराठे (पृ. ४१६), अमरावती भ्रमणध्वनी : ९४२१७४०८९४

कॅटेलेटीक एजंट्स आणि आयसोटोप्स असे शब्द शीर्षकावर बघून हा लेख रसायनशास्त्र विषयांशी संबंधित असेल असा समज होईल. पण लेख समाजशास्त्र आणि त्यातील म्हणजे समाजातील विविध जनरेशन गॅप्सवर आधारित आहे. ह्या गॅप्स फक्त माणसाच्या वयाच्या अंतरामुळे नाही तर विविध संस्कृती, रुढी, परंपरा, चालीरीती, आणि देश विदेशातील प्रथांच्या संबंधितही आहे.

माझ्या एका ऑलराऊंडर फ्री लान्सर मैत्रीणीच्या दीपावली निमित्ताने फॉरवर्ड केलेल्या पोस्ट वरून मला हा विषय सुचला. खरंतर ही मैत्रीणच इतकी हरहुन्नरी आणि चतुरस्त्र आहे की तिच्या एक एका गुणावर अनेक लेख होतील. पण तुर्तास तरी तिची एक फॉरवर्डेड पोस्ट एवढेच डोक्यात घोळतयं. खरंतर ती पोस्ट आता पूर्ण आठवतही नाही. पण आशय डोक्यात फिट्ट बसला आहे. तिचे इंग्रजीही उत्तम आहे. तिच्या मराठी पोस्टमधील ट्रिट मागणाऱ्या मुलांसाठी वापरलेले इंग्रजी शब्द आठवून त्याला मराठी प्रतिशब्दही सुचणे कठीण आहे. जेवढे जमेल तेवढे प्रयत्न करतो. पण पोस्टमध्ये नमूद केलेले फॅड खूप बोकाळले आहे. त्यामुळे तुम्हाला संदर्भ सहज लागेल आणि मला अभिप्रेत काय आहे ते सहज तुमच्या लक्षात येईल.

पोस्टचा मतितार्थ असा की दिवाळीच्या नरकचतुर्दशीच्या दिवशी कॉलनीमधील चांगल्या घरची मुले-मुली चित्र विचित्र अवतार करून म्हणजे कोण चेटकीण, राक्षस, राक्षशीण, कोणी हाडे रंगवलेल्या भुताच्या पोषाखात, कोणी ड्राक्युलाच्या अवतारात तर कोणी हिंस्र पशू पक्षी बनून घरोघरी जाऊन दिवाळीची ट्रिट म्हणून कॅडबरी, चॉकलेट्स, आणि तत्सम पदार्थ मागत असतात. खरंतर मला हे वाचुन 'दे दान तो छुटे गिरांन (ग्रहण)' हे आठवले. पण लेखाचा विषय सुचला तो त्या पोस्टमधील पुणेरी आजोबांनी मुलांच्या घेतलेल्या फिरकी मुळेच. ते मुलांना म्हणाले, ''आजचा दिवस आणि त्याचे महात्म्य तुमच्या आईबापाला तरी माहिती आहे कां! की त्यांना न सांगताच हा उपद्व्याप करीत आहात. आज श्रीकृष्णाने नरकासुराला ठार करून त्याच्याकडे नरक यातना भोगणाऱ्या अनेक स्त्रिया आणि पुरुषांना मुक्त केले आणि तुम्ही मात्र तीच नरकाची दृश्ये जागवत भिक मागत फिरताय.''

बरं हा प्रकार फक्त मेट्रोपॉलिटन शहरातच नाही तर परदेशातील भारतीय विद्यार्थ्यांनीही तिकडे उच्च शिक्षण घेण्यासोबतच, दिवाळीच्या दिवशी आपल्या परंपरा आणि संस्कृतीच्या मढ्यावर असेच दिवे लावलेत. आमच्या वहिनींचा भाऊ भाऊबिजेला ओवाळून घ्यायला आला होता. त्याची बायको सांगत होती की त्यांचा मुलगा अमेरिकेत एम. एस. करतोय, त्यांच्या मुलाने आणि होस्टलमधील मित्रांनी असेच चित्र-विचित्र अवतार करून व्हिडिओ कॉल केला होता. त्यांच्या मुलाने मोठ्या मासोळीचा गेटअप केला होता. वहिनींचा भाऊ आणि भावजय यांनी दिवाळीच्या दिवशी आपल्या सणांची अशी टिंगल टवाळी केल्याबद्दल मुलाची खरडपट्टी काढली.

आतापर्यंतच्या भारुडात माझ्या लेखाचे शीर्षक व तो विषय बाजूलाच पडलाय. तर त्या पुणेरी आजोबांनी केलेल्या पुढील वक्तव्यावरून खरं तर माझा विषय सुरू होतो. ते आजोबा पुढे म्हणाले की, ''तुमच्या पैकी बरेच जणांची नुकतीच मौंज झाली आहे. कितीजणांनी चार घरी जाऊन तर सोडाच पण व्रतबंधाच्या मंडपात चार लोकांना, मोठ्या आवाजात 'ओम् भवती भिक्षांन देही' म्हणत न लाजता भिक्षावळ मागितली आहे रें!''

मला आजोबांचे हे बोलणे आणि विचार रसायनशास्त्रातील 'कॅटेलेटीक एजंट'सारखे वाटले. शाळेत आणि कॉलेजमध्ये रसायनशास्त्र शिकून सुमारे पन्नास पंचावन्न वर्षे झालीत. त्यामुळे

धूसर झालेल्या कॅटेलेटीक एजंट आणि आयसोटोपचा अर्थ गुगलच्या महाजालातुन कन्फर्म केला आणि योगायोग म्हणजे मला ज्ञात आणि अभिप्रेत असलेलाच तो निघाला. तर कॅटेलेटीक एजंट म्हणजे, रसायनशास्त्राच्या भाषेत जो पदार्थ रासायनिक प्रक्रियेत स्वतः भाग घेत नाहीत आणि त्याच्यात भौतिक आणि रासायनिक परिवर्तनही होत नाही, पण त्याच्या उपस्थितीमुळे दोन किंवा अधिक पदार्थामध्ये रासायनिक आणि भौतिक क्रिया लवकर घडून, नवीन पदार्थ तयार होतो. शाळेत शिकत असताना आमच्या रसायनशास्त्राच्या सरांनी यासाठी बहुतेक साखर आणि वनस्पती तुपांसाठी वापरल्या जाणाऱ्या कॅटेलेटीक एजंट्सची उदाहरणे दिली होती. तर माझ्या मते या आजोबांच्यामुळे मुलांना आपले सण, त्या मागच्या परंपरा आणि धार्मिक सण व संस्कृती याची तोंडओळख तरी झाली असावी. निदान ही पोस्ट वाचणाऱ्या माझ्या सारख्या अनेकांच्या सांस्कृतिक, धार्मिक व समाजशास्त्र आणि रसायनशास्त्राच्या ज्ञानाची उजळणी झाली. मला लेखासाठी विषयही मिळाला.

विचार करतांना लक्षात आले की, 'या आजोबांसारखे अनेक कॅटेलेटीक एजंट आपल्या समाजात आहेत आणि समाजशास्त्रीय दृष्ट्या त्यांची आजच्या युगात खूप गरज आहे. प्रत्येक घरातील आजी-आजोबा यांनी अशा कॅटेलेटीक एजंटची भुमिका घेतली पाहिजे. अर्थातच आई-वडीलांनी त्यांना निर्विरोधपणे अशी भुमिका घेऊ दिली पाहिजे आणि नातवंडांवर संस्कार करण्याची जबाबदारी त्यांना त्यांच्या पद्धतीने निभावू दिली पाहिजे.'

तर आता 'आयसोटोप्स.' याचा अर्थ समस्थानिक. रसायनशास्त्राच्या पीरिऑडिक टेबलमध्ये यांचे स्थान आणि पीरिऑडिक नंबर एकच असतो. त्यामुळे मुलद्रव्य एकच असले तरी त्या मुलद्रव्याच्या आयसोटोप्सचे गुणधर्म वेगवेगळे असतात. गुगलनुसार यांच्या अणुत इलेक्ट्रॉन आणि प्रोटॉनची संख्या सारखीच असते पण न्युट्रॉनची संख्या वेगवेगळी असते. उदाहरणार्थ कार्बन, आयोडिन यांचे आयसोटोप्स खूप आहेत. (शाळेत शिकलेले रसायनशास्त्र बरेच लक्षात आहे, परीक्षेच्या वेळी लक्षात ठेवले असते तर रसायनशास्त्राचे डिस्टिंक्शन थोडक्याने हुकले नसते) समाजशास्त्रात अशा आयसोटोप्सची आजच्या स्थितीत खूप आवश्यकता आहे. 'एका धार्मिक परंपरेचा आयसोटोप' मला लक्ष्मीपूजनाच्या आदल्या दिवशी सुचला. माझ्या मुलांच्या लहानपणी ख्रिसमसच्या आदल्या दिवशी माझे मोठे भाऊ माझ्या मुलांना (मुलगा आणि मुलगी दोघांनाही) सांगायचे की, 'आज मोजे चांगले धुवून वाळत घाला. रात्री सांताक्लॉज येऊन त्यात खाऊ ठेवून जात असतो.' माझी मुले मग हौशीने मोजे स्वच्छ धुवून बाहेर तारेवर वाळत घालायचे. रात्री मुलं झोपली की काका त्या मोज्यात खाऊ म्हणून चॉकलेट्स, गोळ्या ठेवायचे. मुलगी थोडी लहान होती, तिला वाटायचे की खरंच सांताक्लॉज आला होता. ती सगळ्यांना सांगायची की सांताक्लॉजनी माझ्या मोज्यात खाऊ ठेवला. मुलगा म्हणायचा हट् रतनकाकांनी ठेवलाय. मग दिवसभर रतनकाका त्यांचे सांताक्लॉज असायचे. ते त्याच्याकडे काहीही मागत रहायचे. तो ही त्यांच्या सर्व मागण्या पूर्ण करायचा.

लक्ष्मीपूजनाच्या आदल्यादिवशी माझ्या मनात विचार आला की खरं तर सर्व धर्मांची एकच विचारधारा आहे. 'विविध धर्मातील मुलद्रव्य - शिकवण आणि सिद्धांत एकच आहे. म्हणजे पिरीऑडिक टेबलच्या भाषेत सर्व एकच म्हणजे समस्थानिक आहेत. त्यांचा पिरिऑडिक नंबर म्हणजे शिकवण आणि सिद्धांत हा एकच आहे. पण यांचे आयसोटोप्स विविध आहेत.' यांच्या न्युक्लियसमध्ये इलेक्ट्रॉन आणि प्रोटॉन संख्येने सारखेच आहेत पण न्युट्रॉनच्या संख्येत भिन्नता आहे. त्यामुळेच मत भिन्नता, विचार भिन्नता, वेगवेगळे आचार-विचार आहेत. पण न्युक्लियस रचना एकच असल्याने बऱ्याचशा रुढी, परंपरा सारख्या आहेत. जसे सांताक्लॉज प्रमाणे कोजागिरी, आषाढी एकादशी, कार्तिकी एकादशी, महाशिवरात्री अशा दिवशी ईश्वराचे नाम स्मरण करत कोण जागे आहे, कोजागरती असे म्हणत लक्ष्मी स्वतः भ्रमण करून बघते आणि त्यालाच प्रसन्न होते अशी समजूत आहे. मग माझ्या ही सुपीक डोक्यातून कल्पना बाहेर पडली की लक्ष्मीपूजनाच्या आदल्या दिवशी पुजेच्या वेळी खांद्यावर घ्यायचे उपरणे जो रात्री स्वच्छ धुवून बाहेर वाळत घालेल, त्यांच्या उपरण्यात लक्ष्मी आई धन संपत्ती बांधून जाईल, आणि 'धर्माचे विविध आयसोटोप्स' गुण्यागोविंदाने एकत्र नांदतील. कारण सर्वांचे न्युक्लियस एकच आहे. यासाठी सर्व धर्मांच्या फालोअर्सना माझ्या संदर्भित फॉरवर्ड पोस्टमधील आजोबांच्याप्रमाणे कॅटेलेटिक एजंट म्हणून कार्यरत व्हावे लागेल. फॉलोअर्सच या कामासाठी पुढे यायला हवेत. कारण धर्म प्रचारक आणि धर्म पंडित मार्ग सांगतात, पण त्यावर चालायचे काम तर फॉलोअर्सचेच आहे ना!!

♦

# रमाची रमाई होताना...

• सौ. संजना आनंद मराठे, कुर्धे, रत्नागिरी भ्रमणध्वनी : ९४२००८६७६०

हौस म्हणा, आवड म्हणा, माझ्या दिवंगत वडिलांची इच्छा म्हणून म्हणा, ३ वर्षांपूर्वी 'उमा-रमा' आमच्या गोठ्यात आल्या. लहानाच्या मोठ्या होता होता त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये समजत गेली. तशा दोघीही मस्तीखोरच. पण उमा तुलनेत शांत, गरीब, कोणींही हात लावला तरी चालेल अशी. याउलट रमा- एककल्ली, नवीन माणसाने हात लावणं सोडा, साधं बघायला समोरही जायचं नाही. अगदी लहान होती तेव्हापासून नवीन माणूस गोठ्यात आलं तरी फुसकटायची. तर अशा या दोघी मोठ्या झाल्यानंतर निसर्गनियमानुसार त्यांच्यासाठी शेजारच्या काळूला काही महिन्यांसाठी घरजावई केला खरा. पण बघावं तेव्हा रमा त्याच्यापासून लांबच उभी असायची. उमाची आणि त्याची मात्र चांगली मैत्री झाली होती. काही दिवसांनी त्यांच्या मैत्रीचा उमावर झालेला परिणाम दिसू लागला. रमामधे मात्र फारसा फरक दिसत नव्हता. त्यामुळे ती गाभण आहे हेच बरेच दिवस लक्षात आलं नव्हतं. मात्र गेले काही दिवस ती थोडी संथ, शांत झाल्यासारखी वाटत होती. गडग्यांवरून घोड्यासारखी लिलया उडी मारणं बंद झालं आणि वसूबारसेच्या दिवशी आंघोळ घालताना अजिबात मस्ती केली नाही तेव्हा रमासुद्धा गाभण असल्याची खात्री पटली. पण दिवस पूर्ण कधी होणार याचा काही अंदाज येत नव्हता. आम्ही उमाच्या निकालाकडे डोळे लावून बसलेलो असतानाच वाडीवरच्या बारकू चव्हाणने रमा येत्या ८ दिवसांत विणार असल्याचे भविष्य वर्तवल्यावर आम्हाला आश्चर्यच वाटले पण ते पटले मात्र नाही. भाऊबीजेच्या दिवशी सुद्धा उमा ३ वाजताच गोठ्यात आली, रमा मात्र एकटीच सड्यावर गेली ती ५ वाजेपर्यंत परत आली नाही म्हणून मी तिला घेऊन आले. घाटी उतरताना थोडी जडावल्यासारखी वाटली.

रात्री घरातलं सगळं आवरल्यावर साधारण १०.४५ वाजता, दूसऱ्या दिवशी गोळवलीला वर्गीवर रहायला जायचं असल्याने कपड्यांची पिशवी भरायला घेतली आणि अचानक गोठ्याकडे धडाम् असा पाठोपाठ २/३ दा आवाज आला. मी पटकन मागच्या पडवीत येऊन पटपट सगळे दिवे लावले आणि खालूनच अंदाज घ्यायला सुरूवात केली. तर गोठ्याच्या खिडकीतून दिसणारी वेडीवाकडी हलणारी शिंग बघून, रमा उलट-सुलट फिरत्ये असं लक्षात आलं आणि वाटलं की बिबट्या आलाय की काय? किंवा काही सरपटणारं जनावर या कल्पनेने घाबरलेच. लगेचच झोपलेल्या मराठे सरांना जागं करून परिस्थिती सांगितली. तेही लगेचच उठले आणि गोठ्याकडे गेले. खबरदारी म्हणून हाताशी आलेली एक लहान काठी त्यांच्या हातात दिली आणि मोठी काठी आणायला पुढच्या पडवीकडे गेले. काठी घेऊन वर गोठ्यात जाईपर्यंत सरांनी दार उघडलं होतं. पाठोपाठ मी पोचतच होते. तेवढ्यात आत बघून सर म्हणाले, 'अगं रमा व्याली.' आश्चर्य, उत्सुकता आणि आनंद अशा संमिश्र भावनांनी मन भरून गेलं. आत बघितलं तर कोपऱ्यात रमासारखंच काळ्या कुळकुळीत वासराचं मुटकुळं आणि वासराकडे जाण्यासाठी झेपावणारी अस्वस्थ रमा. आता खरा प्रश्न होता की नेमकं करायचं काय? अखेर बाकी काही सुचण्यापूर्वी रमाची जीवघेणी धडपड बघून तिचं दावं सोडण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे केल्यावर लगेचच ती वासराकडे झेपावली. रमाला सोडलं खरं तरी पुढे काय हा प्रश्न होताच. दोघांचेही मेंदू जणू बधीर झाले होते. ३/४ महिन्यांनी ही जबाबदारी येईल असं वाटत असतानाच अचानक हे घडलं होतं. एखाद्या गोष्टीची हौस असणं आणि त्याचा अनुभव असणं, ज्ञान असणं ह्या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

मग लगेच भाऊबीज करून पुण्याहून परत निघालेल्या सिद्धार्थला फोन करून बातमी सांगितल्यावर त्याच्याकडूनही अपेक्षित असा आश्चर्यकारक प्रतिसाद आलाच. पण सावध होत लगेचच त्याने श्रीपादला फोन करून बोलावून घेण्यास सुचवले. त्याप्रमाणे १०/१५ मि.त श्रीपाद आलाच. तोपर्यंत ११.३० वाजलेले. एव्हाना अर्ध्या तासाचं ते वासरू उठून धडपडत पुढे सरकू लागलं, त्याच्याबरोबर रमाही पुढेपुढे जाऊ लागली. आता खरी कसोटी होती कारण वासरू उमापासून दीड-दोन फुटांवर होतं आणि त्याच्या असुरक्षिततेच्या शंकेने रमा उमाच्या अंगावर जाण्याची शक्यता वाटली. मग मात्र काहीतरी हालचाल करणं गरजेचं होतं. श्रीपादने सुचविल्याप्रमाणे मी घाबरत घाबरत रमाचं दावं धरलं आणि तिला बांधायचा प्रयत्न केला. पण शेण-मुतात

लडबडल्यामुळे ओलं झालेलं दावं बांधण्यापूर्वीच माझ्या हातून सुटलं आणि धडपडणारी रमा पुन्हा एकदा वासराकडे झेपावली. आता वासराला थांबवणं गरजेचच होतं. मग असं ठरलं की मी रमाचं दावं पकडतानाच सरांनी वासराला उचलून गवाणी पलिकडे रमाच्या समोर ठेवायचं. या युक्तीमुळे रमाला बांधण्यात यश आलं. यानंतर श्रीपादने सांगितल्यानुसार वासराला गरम पाण्याने आंघोळ घालून कपड्याने पुसून कोरडं करून पेंढ्यावर ठेवलं. आता प्रश्न होता दूध काढण्याचा. मी १५ सालानंतर इतक्या दिवसांत दूध काढलं नव्हतं आणि तेव्हा आमच्याकडे म्हैस होती. म्हैस गायीच्या तूलनेत शांत असते. गाय त्यामानाने तिखट स्वभावाची असते, त्यातून ती रमा म्हणजे बघायलाच नको. यादरम्यान श्रीपाद आणि नंतर अधिक अनुभवी म्हणून प्रकाशकाकांनाही फोन करून झोपेतून उठवून बोलावून घेतलं होतं, ते दोघे गोठ्यात यायला निघाले की रमा मोठ्याने फुसकटून त्यांच्या अंगावर जायची, जोरजोरात नकारार्थी मान हलवून आपला निषेध व्यक्त करत होती. तिचं ते रौद्र रूप बघून मला दडपणच आलं होतं. पण नंतर लक्षात आलं की मी किंवा सर सवयीचे असल्याने आम्हाला तिचा विरोध नव्हता. म्हणून घाबरत घाबरत दूध काढायचा प्रयत्न करून पाहिला. तसा तिने विरोध नाही केला. पण प्रयत्न अयशस्वी ठरला. अखेर आता उद्या सकाळी काय ते बघू या विचारापर्यंत आलो.


पण एवढं सगळं होईपर्यंत रात्रीचे २ वाजले. रमाही थोडी शांत झाली होती. मग खाली येऊन कॉफी पिऊन झाल्यानंतर श्रीपाद आणि प्रकाशकाकांना आता घरी जाण्यास हरकत नाही सांगितल्यामुळे पुढे काय करायचं ते समजावून सांगून दोघंही आपल्या घरी गेले. आम्ही पण मग गोठ्यातली बाकीची साफसफाई, रमाची आंघोळ वगैरे आवरून ३ वाजता झोपलो. अनपेक्षितपणे वेळेच्या आधीच आलेल्या जबाबदारीने थोडं गोंधळायला झालं होतं. या सगळ्या धावपळीमुळे दमायलाही झालं होतं. त्यामुळे अंथरूणावर पडल्यावर लगेचच डोळे जडावून मिटले. गेली ६/७ वर्षे बऱ्यापैकी निद्रानाशाचा विकार जडल्यामुळे अशी शांत झोप खूप महिन्यांनी अनुभवली.

दूसऱ्या दिवशी सिद्धार्थने परिस्थितीचा ताबा घेतल्यावर हळुहळू नवख्या आईपणाला सरावलेली रमा स्थिरावली. तिसऱ्या दिवशी व्यवस्थित दूध द्यायला लागली. आता २ वेळा मी पण दूध काढू शकले. दिवसभरात किमान ८/१० फेऱ्या तरी आता गोठ्यात होतायत. मागच्या दीड-दोन वर्षांपासून मधुमेहामुळे आलेलं जडत्व, अशक्तपणा, गुडघेदुखी सगळं कुठच्या कुठे पळालंय. वेळ मिळाला की गोठ्यात जाऊन रामनामाचा जप करत किंवा भजन म्हणत वासरासह उमा-रमाच्या अंगावरही हळूवार हात फिरवत रहायचा जणू छंदच जडलाय. बाकीचं जग विसरायलाच झालंय. ही पोस्ट लिहून पूर्ण करायला ३ दिवस लागले. आत उमाचा नंबर कधी लागणार या प्रतिक्षेत. रमाई होताना रमामधे जितके बदल झाले तेवढच आमचंही जग बदलून गेलंय. अर्थात हा खूप सकारात्मक बदल आहे. रामनामाच्या जपाने मिळालेली मानसिक स्वस्थता तिघींच्याही डोळ्यात दिसते तेव्हा जन्म सार्थकी लागल्यासारखं वाटतं.

**गो माता की जय। भारतमाता की जय।** ♦

---

In Bharat we are using very less quantity of insulation bricks or Pannels for what ever May be reasons but country like Bharat should use more and more insulation bricks and sandwich Pannels this will be useful for reducing cost of air conditioning converting saving of electricity Sandwich panels are a modular construction material used in the Middle East to provide insulation and weather resistance. They are made up of multiple layers, with a core of insulating material sandwiched between two metal sheets. Here are some types of sandwich insulation bricks and panels: Rockwool sandwich panels These panels are fire resistant, moisture and humidity resistant, and offer excellent thermal insulation. They are easy to install, require minimal maintenance, and have a long lifespan. Concrete-polystyrene sandwich masonry blocks These blocks are used to construct non-load bearing, masonry walls in buildings. Insulation LLC sandwich panels



These panels are available in aluminum and steel profiles, and are designed for buildings that require high insulation values. The core is injected with polyurethane, which is used worldwide as an insulation against temperature extremes. Other insulating materials that can be used to make sandwich panel cores include: Expanded polystyrene (EPS), Mineral wool, Rigid polyurethane (PUR), and Polyisocyanurate (PIR). These are common Pannels used in Middle East. Disclaimer- All data and information provided herein are for informational purposes only. All rights and credits belong to their respective owners Stay tuned with Progressive Expert Consulting Pvt. Ltd. For Trainings and consultancy Services

- **Parimal Marathe** (89755 67574)

PECPL , Vision that build values, 15 Agrahayan shaka 1946, Indian National Calendar

# आर्टिफिशल इंटिलिजंस (AI) म्हणजेच ‘ए आय’ अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता

◆ डॉ. गिरीश जाखोटिया (पृ. १२९)

भ्रमणध्वनी : ९८२००६२११६

**ए**आय बद्दल भरपूर लिहून आणि बोलून झालंय. परंतु याचमुळे आमचा संभ्रमही बराच वाढलाय. सैद्धांतिकदृष्टीने पाहू गेल्यास मोबाईलच्या स्वरूपात आपण मर्यादित अर्थाने एआय वापरतो आहोतच. उदाहरणार्थ, मोबाईलवर मराठी किंवा इंग्रजीत टाईप करताना बऱ्याच शब्दांचे स्पेलिंग तो मोबाईलच पूर्ण करतो व म्हणून आपला टायपिंगचा वेग वाढतो. माहिती तंत्रज्ञानातील एका प्रोग्रॅमची (मॉडेलची) अथवा अल्गोरिथमची ही किमया आहे. अर्थात एआय मात्र आज खूप पुढे गेलेले आहे, जे आनंददायी आहे नि तितकेच धोकादायकही आहे. एआयमुळे नोकऱ्या जातील किंवा उद्योजकीय माहितीचे स्वामित्व अबाधित राहणार नाही अशी एक साधारण भिती आज सर्वत्र पसरलेली आहे. मुळात एआयचे एकच एक असे स्वरूप नाही. तो आपल्या मेंदूप्रमाणेच काम करणार आहे, किंबहुना करतो आहे. मेंदूची तीन महत्त्वाची कामे असतात – १. माहिती किंवा ज्ञानाला ग्रहण करून त्याची साठवण करणे २. अशा साठवलेल्या माहितीचे विश्लेषण करून महत्त्वाचे निष्कर्ष काढणे आणि ३. नव्या कल्पना व गृहितके निर्माण करणे. एआय हा पहिली दोन कामे आपल्या मेंदूपेक्षा कितीतरी अधिक वेगाने (Speed) व आकाराने (Volume)करू शकेल, ज्यात चुकासुद्धा कमीतकमी असतील. नव्या कल्पना ज्या एआय निर्माण करेल त्या त्याने साठवलेल्या माहिती, पॅटर्न व प्रक्रियांमधून उपलब्ध होतील. म्हणजेच एआय हा आजतरी मानवाने त्यांस दिलेल्या ताकदीपुरतेच काम करेल. एआय स्वतःच स्वतःला कितपत सुधारेल किंवा नवीनतेवर काम करेल, ते आस्तेकदम येणारा काळच ठरवेल. अर्थात सध्या Self - Learning Machinesना विकसित करण्याचे काम वेगाने चालू आहे. हा एआयचा मोठा फायदा व खूप मोठा धोका हा आम्हा माणसांसाठी असेल. Self Learningची पुढची पायरी असेल भावभावना बाळगण्याची. एआय मुळे एखाद्या यंत्राला उद्या गहिवरून येऊ शकेल किंवा प्रचंड आनंदही होऊ शकेल. अशी कामगिरी म्हणजे कृत्रिम मानवाची संपूर्ण निर्मिती बहुदा म्हणता येईल. ‘बहुदा’ यासाठी कारण मनुष्याप्रमाणे हे यंत्र स्वतःच्या भावनांना मॅनिप्युलेट करू शकेल काय? मानवी कपट किंवा मानवी व्यूहात्मक रचना करण्याची या यंत्राची क्षमता असेल काय? – येणाऱ्या काळात हे कळेलच.




एआयचे चार प्रमुख प्रकार आज वापरात आहेत. जसजसा एआय कार्यान्वित होईल, त्याचे आणखी नवे प्रकार तयार होत जातील. पहिल्या प्रकाराला आपण जनरेटिव्ह एआय म्हणू शकू. ‘ओपन एआय’ या कंपनीने चाट जीपीटी ही अभूतपूर्व प्रणाली विकसित केली. ही प्रणाली आपल्यासोबत प्रश्नोत्तरे करते, जुन्या माहितीचे विश्लेषण करुन काही पॅटर्न बनवते व नवे निष्कर्ष अथवा रचना तयार करते. भाषांतर, सामान्य निबंध – लेखन, गाणी व संगीत तयार करणे, माहितीचे संकलन करुन नवे शोध – निबंध लिहिणे, तसे विस्तृत ऑडिओ व व्हिडीओ तयार करणे इ. अनेक कामे ही प्रणाली करते. ‘चाट जीपीटी’चा इंग्रजीतील विस्तार म्हणजे ‘Chat Generative Pre - Trained Transformer’. एआयचा दुसरा प्रकार हा खूप रंजक व महत्त्वाचा आहे. व्यक्तींचे व व्यक्तीसमूहाचे वागणे तपासून तसे निष्कर्ष काढत ही प्रणाली नजिकच्या भविष्यातील त्यांच्या संभाव्य वागण्याचे भाकित करेल. करारमदार करण्यासाठी अशा भाकिताचा खूप उपयोग होऊ शकेल. आंतरराष्ट्रीय करार, युद्धनीती, खेळातील आराखडे, कर्मचाऱ्यांचा एखाद्या नव्या धोरणास मिळणारा संभाव्य प्रतिसाद, पुरवठादार व वितरकांचा प्रतिसाद, विद्यार्थ्यांना कौंसेलिंग इ. महत्त्वाच्या गोष्टी अजमावणे व करणे आता सोपे होईल. अर्थात अशा भाकितांचा संभाव्य गैरवापर हा गंभीर असू शकेल.

एआयचा तिसरा प्रकार हा क्लिष्ट गोष्टींच्या विश्लेषणाचा आहे. शेकडो घटक व त्यांचा एकमेकांवरील परिणाम तपासून

महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी हा प्रकार खूप उपयोगी पडेल. उदाहरणार्थ, भारतीय अर्थव्यवस्थेत 'जीएसटी' या राष्ट्रीय व राज्यीय करप्रणालीत महत्त्वाचे बदल करण्यासाठी शेकडो घटक तपासावे लागतील. Interdependent व Independent Factorsचे सुयोग्य विश्लेषण करून बहुतांश चुका टाळता येतील. एखादे पीक घेण्यासाठी अनेक शेतकी व बिगरशेतकी घटकांचे क्लिष्ट असे परस्परसंबंध तपासून निर्णय घेणे आता सोपे जाईल. भारतासारख्या देशात शेकडो घटक कार्यरत असतात, संपूर्ण व खरी माहिती वेळेवर प्राप्त होत नाही, धोक्यापेक्षा अनिश्चितता जास्त असते इ. अशा परिस्थितीत एआयची ही प्रणाली खूप उपयोगी पडेल. वैद्यकीय पेशात एखाद्या गंभीर रुग्णाची सर्जरी करण्याआधी साईड इफेक्ट्स, मल्टिपल ऑर्गन फेल्युवरची शक्यता आणि पर्यायी उपायांचे जटील विश्लेषण आता सोपे होऊ शकेल. महत्त्वाचे व रंजक उदाहरण म्हणजे निवडणुकीचे भाकीत वर्तविण्याची सर्कस. एआयमुळे अनेक शक्याशक्यतांची मोट बांधत कमीत कमी चुकीचा अंदाज वर्तवता येईल. अर्थशास्त्रात कल्पना करा Stagflationची. हा धोकादायक प्रकार म्हणजे एकाच वेळी Stagnation आणि Inflationचा संयुक्त परिणाम. यातून बाहेर पडणे खूप कठीण असते. एआयचा वापर करून शेकडो factors संयुक्तपणे अजमावता येतील व कमीतकमी जोखमीचा सुटकेचा मार्ग ठरवता येईल.

एआयचा चौथा प्रकार तर अत्यंत विलक्षण ठरणार आहे. यंत्रांसोबत मी बऱ्याचवेळा बुद्धिबळ खेळलो आहे व ८०% यश मिळवले आहे. या यशाचे प्रमुख कारण म्हणजे यंत्राला अनपेक्षित अशी खेळी खेळण्याचे! यंत्राला आज तरी बऱ्यापैकी गंडवता येतं कारण ते नवनव्या कल्पनांचे सृजन करू शकत नाही. आपण जी प्रणाली बनवतो, जो डेटा त्या यंत्रामध्ये कोंबतो त्यानुसार ते यंत्र आपली कामगिरी करतं. परंतु कल्पना करा की मनुष्याप्रमाणे यंत्रही स्वतःच स्वतःमध्ये सुधारणा करीत राहिले तर मोठ्या गजब गोष्टी होऊ लागतील. काही अंशी हे साध्य झाले आहे. आईनस्टाईन, प्लूटो, लिंकन व भारतातील आर्यभट किंवा चरक इ. महामानवांच्या बुध्यांकांचे मिश्रण जर एखाद्या यंत्राला मिळाले तर तो कोणत्या प्रकारचे 'आऊटपुट' देईल? (की या भिन्न भिन्न विचारसरण्या एकमेकांशी वादविवाद घालत त्या यंत्राला गोंधळात पाडतील?) थोडक्यात असे की यंत्रे ही मानवाची मदत न घेता Self - Learning द्वारे Self - Improvement करू लागली तर तीच मनुष्यजातीवर राज्य करू लागतील. या शक्यतेवर काही इंग्रजी चित्रपट तुम्ही पाहिले असतीलच. एआयच्या या चौथ्या प्रकाराचे अनेक सामाजिक, सांस्कृतिक व बौद्धिक परिणाम होऊ शकतात.

एआय हे शाप की वरदान, हे ठरविण्याची नैतिक, बौद्धिक व सामाजिक जबाबदारी ही आमचीच. एआयला आम्ही प्रगल्भतेने वापरले तर तो आमचा उत्तम सहाय्यक होईल, अन्यथा तो एक खूप धोकादायक मास्टर होईल. हे म्हणजे जवळपास अणूऊर्जा की अणूबॉम्ब, असे ठरवण्यासारखे असेल. एआयचे फायदे आपण आधी पाहूयात. जी कामे आम्ही 'रोबोटिकली' करू इच्छितो, ती सर्व बौद्धिक कामे आता एआय करू शकेल. उदाहरणार्थ, अकौंटिंग, संपादन, भाषांतर, रचनात्मक डिझाइन्स इ. प्रचंड माहितीचे ग्रहण, साठवण व विश्लेषण एआय करेल. शेकडो पर्यायी उत्तरांपैकी एक अचूक किंवा कमीतकमी चूक असणारे उत्तर एआय निवडेल. माहीत नसलेल्या घटकांचे व मानवी स्वभावांचे विश्लेषण एआय लीलया करू शकेल. मनुष्याच्या तुलनेत एआयचा वेग, अचूकता व कामाचा आवाका हा खूप अधिक असेल. अनेक पर्यायी कल्पनांचे आकृतीबंध तयार करीत एआय सर्वाधिक फलदायी कल्पना निवडू शकेल. वर म्हटल्याप्रमाणे यंत्रे स्वतः स्वतःतील सुधारणा करु लागले तर एआय मधील ती क्रांतीच ठरेल. नवे आणि प्रचंड गुंतागुंतीचे प्रकल्प हे चांगलं प्रयोजन, नियोजन आणि संयोजन न झाल्याने बिघडतात. इथे गरज असते ती Coordinated Efforts ची. सर्वांच्या प्रयत्नांमध्ये एकवाक्यता ('सिनर्जी') आणण्यासाठी एआयची मोठी मदत होईल. प्रक्रियांना कमीतकमी वेळेत अचूकपणे पूर्ण करता आल्यास बरीच 'फिक्स्ड कॉस्ट' व 'रिवर्क कॉस्ट' ही कमी करता येईल. एआयचा मोठा उपयोग हा अनिश्चिततेच्या वातावरणात अत्यंत संवेदनशील निर्णय घेण्यासाठी होऊ शकेल. याबाबतीत आमच्या लहान शेतकऱ्यांच्या शेतीचे उदाहरण खूप बोलके ठरावे. एआयचा किफायतशीर फायदा घेण्यासाठी छोट्या शेतकऱ्यांना एकत्र यावे लागेल. याबाबतीत सरकारी गुंतवणूक ही खूप महत्त्वाची ठरेल.

आता आपण एआयमुळे निर्माण होणाऱ्या समस्या व धोके संक्षेपाने पाहूयात. भारत देशी पहिला मोठा धोका हा यंत्रवत काम करणाऱ्या कामगारांना, कलाकारांना व व्यवस्थापकांना असेल. यांची 'रोबोटिक' कामे एआय अधिक चांगल्या प्रकारे करू शकेल. एआयमुळे बनवेगिरी करणाऱ्यांचे फावेल. तुमचं खोटं प्रतिनिधित्व हे लोक सहजपणे करू शकतील. यामुळे ऑन लाईन फ्रॉड्स वाढू शकतील. तुमचा एकांतपणा व तुमच्याबद्दलच्या माहितीची गोपनीयता ही कमी होत जाईल. उद्योजकीय संस्था व अन्यत्र कामगारांची खाजगी मते, सवयी, आवडीनिवडी व बरेच खाजगी व्यवहार हे गुप्त राहणार नाहीत. एआय बऱ्याच गोष्टी करु लागल्याने तुमची स्वतःची क्रिएटिव्हिटी (सर्जनशीलता) ही काही

प्रमाणात धोक्यात येऊ शकेल. तुम्हाला तुमची कल्पनाक्षमता ही खूप वाढवावी व जपावी लागेल. वेगवेगळ्या संस्था, सरकारे व संघटनांची सुरक्षितता ही धोक्यात येऊ शकेल. विशेषतः ऑनलाइन व्यवहार करणाऱ्या संस्थांना हा धोका मोठा असेल. ग्राहकांचा मानसशास्त्रीय ताबा बऱ्याच कंपन्या घेऊ शकतील. यामुळे खरेदीचे निर्णय हे चुकीचे अथवा लादलेले होऊ शकतील. ग्राहकांबद्दलचा खाजगी डेटा हा लबाडीने वापरणाऱ्यांची संख्या वाढेल. मोठ्या कंपन्या या छोट्या व मध्यम आकाराच्या उद्योजकांना त्रास देऊ शकतील. मूळ व नक्कल यामधील फरक गायब झाल्याने 'डुप्लिकेट' गोष्टींचा सुळसुळाट होऊ शकेल. 'सेल्फ लर्निंग मशीन' जर बलवत्तर झाल्या तर मानवी स्वातंत्र्यावर मोठा आघात होऊ शकेल. थोडक्यात निष्कर्ष असा की एआयच्या सामूहिक व वैयक्तिक वापरावर आणि विकासावर आम्हाला सामाजिक, तांत्रिक, उद्योजकीय, राजकीय व सांस्कृतिक नियंत्रण ठेवावे लागेल. परंतू दिवसेंदिवस मूर्ख नेत्यांची व बेजबाबदार देशांची संख्याही वाढत असल्याने एआयचे धोके हे त्याच्या फायद्यांपेक्षा वरचढ ठरण्याची शक्यताच आज जास्त वाटते आहे.

ईमेल – girishjakhotiya@gmail.com

# आकाश कंदील

आकाशकंदील, एक प्रवास
प्रकाश पर्वाच्या आगमनाचा.
आश्विन ते कार्तिक मासाचा,
पौर्णिमा ते पौर्णिमे पर्यंतचा.

आकाश कंदील अन् चंद्र,
एकमेकांचे जणू अभिन्न अंग.
एक महिना दोघांची मस्त दोस्ती,
युती यांची म्हणजे मैत्रीचा सत्संग.

भाग्यवान माझा मोबाईल आहे,
यांच्या युतीचा एकमात्र साक्षीदार.
एकाच दिवशी त्याने पकडले आहे,
दोघांना होताना एकमेकांवर स्वार.

चंद्राचा कलेकलेने ऱ्हास होत
शेवटी अमावास्येला पूर्ण अंधार
पुन्हा कलेकलेने वाढत जाऊन,
पौर्णिमेला परत पूर्ण प्रकाशणार.

आकाश कंदीलाचा प्रवास असाच,
विविध रात्रींच्या उजेड, अंधाराचा.
एक एक स्थित्यंतराचा, परिवर्तनाचा,
आकार, प्रकार अन प्रकाश माध्यमांचा.



चांदणी, झुंबरे, षटकोन, त्रिकोण,
बहुआकृती, रंगीबेरंगी, विविध प्रकार.
काड्या, तारा, अन कागदांचे आकार,
पणती, मेणबत्ती, दिव्यांनी होतो साकार.

विविध धर्म आणि सांस्कृतीक सण,
उभारतात याला जणु काही तोरण.
ख्रिसमस अन दिवाळीचे आभुषण,
आकाश दिव्यांसाठी हे जणू कारण.

**संजय रामचंद्र मराठे (पृ. ४१६)**, अमरावती
भ्रमणध्वनी : ९४२१७४०८९४

# सहवेदना

माझी आई, श्रीमती निर्मला श्रीपाद मराठे पुणे हिस, आज तारखेने स्वर्गवास होऊन एक महिना झाला. मराठी तिथी प्रमाणे जन्म : अक्षय त्रितिया (१० मे १९३४ साली); मृत्यू : अश्विन शुद्ध द्वितीया (४ ऑक्टोबर २०२४) तिच्या विषयी काही आठवणी...

१९५५ साली प्रथम, प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरी आणि नंतर विवाह. १९७४ साली शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून बढती.

सर्व आयुष्य आणि नोकरी सातारा जिल्ह्यात झाली. सातारा येथे शाहूपुरीत निवृत्ती नंतर १० वर्षे वास्तव्य होते.

स्वतःच्या हिमतीवर संपूर्ण संसाराची जबाबदारी घेऊन आणि सासरच्या आणि माहेरच्या सर्वांना बरोबर घेऊन आनंदात आयुष्य घालवले. शक्य असेल तेंव्हा सासर आणि माहेरच्या कोणालाही अडी-अडचणीच्या वेळी कष्टाने आणि पैशाने मदत केली.

बऱ्याच जणांना शिक्षणासाठी प्रोत्साहन आणि आधार दिला. शैक्षणिक प्रवेशासाठी मदत केली. बऱ्याच जणांची लग्ने जुळवली आणि नोकऱ्या लावून दिल्या.

प्रवास, मनोरंजन, गाणी म्हणणे, हार्मोनियम वाजवणे, कविता आणि बारशासाठी पाळणा तयार करणे हे तिच्या स्वभावाचे काहि विशेष पैलू होते.

स्नेह-संमेलने आयोजित करणे, उत्तम स्वयंपाक करणे, लोकांना जेवू घालणे ही पण तिच्या स्वभावाची आणखी काही खास वैशिष्ट्ये होती.

उत्तम आयोजक, स्वभावाने कडक, शिस्तप्रिय, थोडीशी मानी, काटकसरी पण स्वभावाने प्रेमळ अशी माझी आई मला प्रेमाने श्रावण बाळ आणि पुंडलिक म्हणत असे.


आपला एक मुलगा, उल्हास इंजिनिअर असून तो टेल्को कंपनीत आहे आणि दुसरा सतीश डॉक्टरेट आहे ह्याचा तिला अभिमान होता.

नाती सायली, स्वराली तसेच अदिती यांच्यावर तिचे विशेष प्रेम होते. संगीता आणि स्वाती या सुनांचे पण तिला कौतुक होते.

माझी पत्नी सौ. संगीता २४ तास काम करते आणि तिला कामाचा कंटाळा नाही आणि सर्वांचे स्वागत करते, हे ती मला आणि इतरांना आवर्जून नेहमी सांगत असे.

माझे वडिल स्वर्गवासी श्रीपाद दामोदर मराठे यांना तिच्या प्रगतीचा अभिमान होता. तिच्या यशात त्यांचा मोठा वाटा होता. आणि तिला त्यांचा पूर्णपणे पाठिंबा होता.

आज तारखेने एक महिना झाला म्हणून तिच्या आठवणी आपल्या हितगुज मासिकासाठी सहवेदना म्हणून पाठवल्या.



श्री विजय मराठे ह्यांच्याशी पण माझ्या आईची ओळख होती. ते शनिवारात बापटवाडीत रहात असताना त्यांच्या नेहमी गप्पा-टप्पा होत. माझी आई गेल्याचे कळल्यानंतर त्यांनी लगेच माझे सांत्वन केले.

माझ्या जवळच्या नातेवाईकांप्रमाणे ते माझ्या घरी दिवाळीचा फराळ पण घेऊन आले. आम्ही बऱ्याच वेळ गप्पा मारल्या. हल्लीच्या व्हाट्सअँपच्या आधुनिक काळात घरी येऊन सांत्वन आणि अंदाजे तास दिड तासगप्पा झाल्या, यावर अजूनही विश्वास बसत नाही. त्यांच्यासारखे लोक आपल्या ग्रुपचे नेतृत्व करतात, आपण भाग्यवान आहोत.

प्रेषक : सतिश मराठे, बाणेर पुणे
(भ्रमणध्वनी ९८२३० ८००८९) ♦

# भालचंद्र नेमाडेंची कोसला : एक ऐतिहासिक धडा

## (एक माणूस - एक दिवस)

• सुधाकर मराठे

इथे उपस्थित असलेल्या कुणाहूनही अधिक काळापासून माझा प्रा. भालचंद्र नेमाडे ह्यांच्याशी परिचय आहे. १९७२च्या मध्यापासून आमची ओळख आहे. तेव्हा मी इंग्लंडमधल्या ऐतिहासिक बंगोर शहरातल्या नॉर्थ वेल्स विद्यापीठात भाषाशास्त्रात एम.ए. करत होतो आणि नेमाडे त्याच वेळी लंडनच्या स्कूल ऑफ ओरिएंटल अँड आफ्रिकन स्टडीजमध्ये पीएच्‌डीच्या अभ्यासात मग्न होते.

मी वीसेक वर्षांपूर्वी नेमाडे ह्यांच्या *कोसला* ह्या अनन्यसाधारण कादंबरीचं इंग्रजी भाषांतर केलं होतं, त्यामुळे कदाचित अन्य कोणापेक्षा मला इथे बोलण्यासाठी विचारलं गेलं असावं. ही कादंबरी हिंदीत त्यापूर्वीच भाषांतरित झालेली होती.

कदाचित भारतातल्या मराठी भाषा न समजणाऱ्या वाचकांसाठी मी केलेलं *कोसला*चं इंग्रजी भाषांतर (त्याचं शीर्षक अर्थातच ककून असं आहे आणि ते मॅकमिलन इंडियातर्फे १९९७ मध्ये प्रकाशित करण्यात आलं आहे.) उपयुक्त ठरलं आहे. म्हणूनच आज मला इथे प्रथम बोलायला सांगितलं जात आहे.

भाषांतराची अस्सलता, वाचनीयता आणि उपयुक्तता, ह्यांबद्दल मी अर्थातच बोलू शकत नाही. त्याचं मूल्यमापन इतरांनी केलं पाहिजे. अर्थात ह्या कादंबरीचं जेवढं चांगलं भाषांतर होऊ शकत होतं, तेवढं मी केलं आहे हे नेमाडे यांनी दोनदा मला खासगी संभाषणात का होईना, सांगितल्याचं मी नक्कीच नमूद करू शकतो. १९९५-९६ मध्ये त्यांच्या मुंबई विद्यापीठातल्या घरात आम्ही भाषांतरातला प्रत्येक शब्द तपासून बघत होतो, तेव्हा त्यांनी पहिल्यांदा मला हे सांगितलं; ह्या वर्षाच्या सुरुवातीला त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन करण्यासाठी मी त्यांना फोन केला असतानाही त्यांनी मला हेच सांगितलं.

एक गोष्ट मात्र नक्की आहे. नेमाडेंचं साहित्य (यात कादंबऱ्या, कविता, साहित्य समीक्षा, निबंध आणि '*कोसला अ‍ॅज ककून*'सारख्या भाषाशास्त्रांवरच्या पुस्तकांचा समावेश होतो.) संपूर्ण भारतासाठी, साहित्यिकांस भाषाशास्त्रीय आणि ऐतिहासिक निकषांवर अत्यंत मोलाचं आहे म्हणूनच आज मला इथे बोलायला सांगितलेलं आहे. ह्याच संभाव्यतेने मला कादंबरीचं भाषांतर करण्यासाठी सर्वप्रथम प्रवृत्त केलं.

या मुद्यावर थोडंसं विषयांतर करून स्वातंत्र्यपूर्व काळातले अत्यंत प्रभावी मराठी लेखक पांडुरंग सदाशिव साने (१८९९ ते १९५०) यांचा संदर्भ द्यायला काही हरकत नाही असं मला वाटतं. ते सानेगुरुजी ह्या नावाने खूप लोकप्रिय होते. सानेगुरुजींच्या १९३७ सालच्या 'धडपडणारी मुले' या पुस्तकातल्या एका भागात पुण्यातल्या सर परशुरामभाऊ (किंवा एस्‌पी) महाविद्यालयातल्या विद्यार्थी आणि प्राध्यापकांसमोर एक स्वामी भाषण देतात. त्यांचा युक्तिवाद किंवा तत्त्वप्रणाली मी तुमच्यापुढे ठेवत आहे:

''मित्रांनो, तुम्हा सर्वांना पाहून मला अपार आनंद होत आहे. काळ्या-सावळ्या, सजल मेघांना पाहून मोराला आनंद होतो. तो आपला पिसारा पसरवतो, नाचतो, तन्मय होतो. तसेच तुम्हाला पाहून मला झाले आहे. तरुण म्हणजे ओल्या हृदयाचे, रसरसलेल्या भावनांचे, जिज्ञासू वृत्तीचे, बुभुक्षित बुद्धीचे जीव होत. ध्येयांना मिठी मारू पाहाणारे, त्यागाला कवटाळू पाहाणारे, संसारांतील चिखलांत अद्याप न बरबटलेले असे तुम्ही आहात. अनंत आकाश तुमच्या समोर आहे. अपार भविष्य तुमच्या समोर आहे. ह्या अनंत आकाशात कोठे उड्डाण करणार, ह्या अपार भविष्यात काय करणार? तुमच्या विचारांतून, तुमच्या स्वप्नांतून, तुमच्या ध्येयांतून उद्याचा भारत सजला जाणार आहे. तुम्ही उद्याचे जनक आहात, भविष्य काळाचे विधाते आहात. ही जबाबदारी तुम्ही ओळखली पाहिजे. तुमच्या ओठांवर जी गाणी व जे शब्द खेळत असतील त्यातून उद्याचे पोवाडे, उद्याची महाकाव्ये, उद्याचे सारस्वत, उद्याचा इतिहास निर्माण होणारा आहे. एका रशियन ग्रंथकाराने म्हटले आहे. 'तरुण कोणती गाणी म्हणतात ते सांगा म्हणजे त्यांच्या राष्ट्राचे भवितव्य मी सांगेन.' मीही तुमची गाणी विचारावयास आलो आहे. कोणती गाणी तुम्ही तुमच्या ओंठावर खेळवता?

इथे स्वामी त्या काळात लोकप्रिय असलेल्या काही छचोर फसव्या प्रणयगीतांचा दाखला देतात, ते विचारतात, तुमच्या ओठांवर खेळणारी गाणी अशी आहेत का? किंवा इथे ते प्रत्येकाला मातृभूमीची सेवा करण्यास प्रेरित करणाऱ्या काही कडव्यांचा उल्लेख करतात.:

*भारतमाता हाका मारी*
*चला, चला रे करू तयारी*

असली गाणी तुमच्या ओठांवर आहेत? आजची कला तुम्हाला काय सांगते आहे, काय शिकवीत आहे?

सानेगुरुजींनी महाराष्ट्रातल्या खान्देश नावाच्या कोपऱ्यातून अनेक वर्षे समाजाची सेवा केली, भारताच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला आणि नेमाडेही त्याच खान्देशातले आहेत. एवढंच नाही तर नव्हाळीचा उत्साह आणि पराकोटीची प्रगल्भता ह्यांचा मेळ साधणाऱ्या *कोसला*च्या माध्यमातून १९६३ साली साहित्यिक विश्वात पदार्पण करत किंवा साहित्यविश्वात स्थित्यंतर घडवून आणणाऱ्या *कोसला* ह्या कादंबरीच्या माध्यमातून, मराठी लोकांच्या भाषेत आपल्या साहित्यनिर्मितीचा श्रीगणेशा करत, नेमाडे ह्यांनी तेवढेच समर्पक आणि 'अपरिहार्य' प्रश्न विचारले.

मी नेमाडे ह्यांच्या आणखी काही कादंबऱ्यांविषयीही बोलू शकलो असतो. मात्र, ह्या कादंबरीने साहित्यविश्व खऱ्या अर्थाने घुसळून काढण्यामागची काही कारणं, तसंच नेमाडे ह्यांचं स्थान पाच दशकांहून अधिक काळ साहित्यविश्वात अग्रेसर राहिल्याची कारणं, ह्यांवर बोलणं अधिक समर्पक ठरेल असं वाटतं. नेमाडे ह्यांनी मांडलेल्या प्रत्येक कल्पनेशी किंवा त्यांनी व्यासपीठावरून उच्चारलेल्या प्रत्येक घोषणेशी सगळे सहमत असतील किंवा नसतील, पण त्यांच्या पहिल्या कादंबरीतून आणि तिच्या प्रभावातून एक गोष्ट मात्र अत्यंत ठामपणे मांडली जाते, ती म्हणजे 'कलेसाठी कला' हे तत्त्व खऱ्या अर्थाने कोणासाठीही वंदनीय ठरू शकत नाही.

मात्र, सानेगुरुजींच्या यापूर्वी उल्लेख केलेल्या कादंबरीत, खान्देशातल्या अमळनेरहून पुण्याला जाऊन एस्‌पी कॉलेजच्या विद्यार्थ्यांना उद्देशून भाषण देण्यास तयारी दर्शवण्यापूर्वीच्या स्वामींच्या मनःस्थितीचं वर्णन करण्यात आलं आहे:

पुण्यास जावे की न जावे, स्वामींचा निश्चय होईना. पुण्यातील विद्यार्थ्यांना मी काय सांगू? प्रवचने, व्याख्याने, चर्चा ह्यांनी अजीर्ण झालेल्या पुण्यातील विद्यार्थ्यांना काय सांगावयाचे? कॉलेजमधील मुलांची कशावरही श्रद्धा नाही. त्यांच्यासमोर जाऊन मी कोणता ध्येयवाद मांडू? पुण्यातील केसरीने महाराष्ट्रातील जनतेची त्रिशंकूसारखी स्थिती केली आहे. सर्व गोष्टींची टर उडवावी हेच जणू पुण्यातील तरुणांचे ध्येय झाले आहे. ध्येयहीन माणसे हाच जेथे पुरुषार्थ झाला, आम्हाला ध्येय वगैरे समजत नाही, आम्हाला चिवडा चिरूट समजतो असेच जेथे प्रौढीने सांगण्यात येते, तेथे जावे का आपण?

अर्थात ह्या पुस्तकात स्वामीजींनी पुढच्या क्षणी पुणे शहराचं आणि मान्यवर पुणेकराचं सर्व योगदान आठवतं. स्वातंत्र्यप्राप्तीची तळमळ वाढावी ह्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांपासून सामाजिक, नैतिक व राजकीय सुधारणा प्रत्यक्षात आणण्याच्या उद्दिष्टाच्या दिशेने त्यांनी दिलेल्या योगदानापर्यंत सर्व काही त्यांना आठवतं. नेमाडे पुण्यात फर्गसन कॉलेजमध्ये शिक्षणासाठी आले तेव्हाही तिथला तरुणवर्ग अत्यंत गोंधळलेल्या व विरोधाभासी समाजाचं प्रतिनिधित्व करत होता. जर सरसकटीकरण करायचं झाल, तर त्या काळात अगदी लहान गावातून पुण्यात आलेल्या नेमाडेंसारख्या व्यक्तीला कोड्यात टाकेल, गोंधळात पाडेल, वैताग आणेल, क्रुद्ध करेल असं खूप काही पुण्याच्या समाजात, इथल्या आयुष्याच्या चालीरितींमध्ये, शिक्षणात आणि पुण्यातल्या महाविद्यालयीन जीवनात होतं. पुण्याच्या सुप्रसिद्ध कॉलजांमध्ये शिकण्यासाठी हजारो तरुण येत असले तरी त्या काळच्या समाजाची स्थिती, सर्व क्षेत्रांतला दांभिकपणा, शिक्षणाचा बहुतेकांसाठी आणि मोठ्या प्रमाणात झालेला खेळखंडोबा हे सर्व नेमाडे ह्यांच्यापूर्वी एकाही महत्त्वाच्या लेखकाने टिपला नाही हे खरं तर आश्चर्यकारकच आहे. नेमाडे ह्यांनी ही परिस्थिती *कोसला*मध्ये अत्यंत समीक्षात्मक स्तरावर चित्रित केली आहे. स्वामींचे विचार जेवढे देशभक्तीने भारलेले आहेत, तेवढी 'कोसला' देशभक्तीपर नाही, पण ह्या कादंबरीत समकालीन समाजाचं मूल्यमापन अत्यंत सडेतोडपणे करण्यात आलं आहे. १९४७ साली मिळालेलं स्वातंत्र्य पंधराएक वर्षांतच बहुसंख्य लोकांसाठी बऱ्यापैकी सवयीचं झालं होतं. मात्र, समाजाच्या बौद्धिक, नैतिक व भावनिक स्थितीवर बाहेरच्या व्यक्तीच्या दृष्टिकोनातून प्रखर (काहीवेळा अति प्रमाणातही) प्रकाश टाकण्याचं काम करण्याचीही गरज तेव्हा नक्कीच होती. 'कोसला' ने नेमकं तेच केलं.

त्या काळापर्यंत मराठी साहित्यात सामाजिक, ऐतिहासिक, नीतीमत्ताविषयक, रोमॅण्टिक आणि वास्तववादी अशा सर्व प्रकारांतल्या काही अत्यंत महत्त्वाच्या कादंबऱ्या आल्या होत्या. त्यातल्या अनेक कादंबऱ्यांमध्ये प्रशंसनीय प्रामाणिकपणाने समस्यांचं परीक्षण करण्यात आलं होतं. नाथ माधव ह्यांच्या 'शरयू' नावाच्या कादंबरीमध्ये हे दिसून येतं. मराठीतल्या या ऐतिहासिक फिक्शन प्रकारातल्या कादंबरीकेत पौगंडावस्थेच्या मध्यावर असलेल्या मुलीच्या किंवा स्त्रीच्या मनातल्या लैंगिक जाणिवांचा विषय हाताळलेला आहे. 'पण लक्षात कोण घेतो'सारखी कादंबरी अजूनही साहित्यिक व सामाजिक अशा दोन्ही निकषांवर महत्त्वपूर्ण समजली जाते. मात्र, समाजावरच्या अत्यंत कठोर, उत्कट आणि सडेतोड टीकेच्या स्वरूपात आयुष्याहून मोठा (लार्जर दॅन लाइफ) प्रभाव निर्माण करणाऱ्या कादंबऱ्या तोवर आलेल्या नव्हत्या.

खऱ्या अर्थाने नवीन दृष्टिकोन, समाजजीवनाचं सखोल आणि महत्त्वपूर्ण मूल्यमापन, आयुष्याचं अभूतपूर्व आणि डोळ्यांत अंजन घालणारं मूल्यमापन यासाठी अभिव्यक्तीचं खऱ्या अर्थाने नवीन माध्यम आवश्यक असतं. साहित्याची त्या काळातली 'परंपरा' मोडणं अशा कादंबरीसाठी गरजेचं नसतं, तर अभिव्यक्तीचं साधन व पद्धत बदलणं आवश्यक असतं. आयुष्य व समाजाच्या मूलभूतरित्या नवीन दृष्टिकोनासाठी अभिव्यक्तीचं नवीन माध्यम आवश्यक असतं. केवळ माध्यमच परंपरा बदलू शकतं. हे टी. एस. इलियट ह्यांनी आपल्याला सुमारे शंभर वर्षांपूर्वी 'ट्रॅडिशन अँड द इंडिव्हिज्युअल टॅलंट' (१९१९) या निबंधातून सांगितलं होतं. खऱ्या अर्थाने नवीन कलाकृतीवर तिच्या परंपरेचा नैसर्गिक प्रभाव असतोच पण ती परंपरेत बदलही घडवून आणते, असं त्यांनी नमूद केलं होतं.

'कोसला'च्या स्वरूपाचं महत्त्व हे असं होतं. साहित्याच्या क्षितिजावर उगवलेली ही नवीन पद्धत तत्काळ फेटाळण्याची वृत्ती नसलेल्या प्रत्येकाला ह्या कादंबरीच्या नावीन्याने आणि अत्यंत आनंददायी, मजेशीर, विनोदी व बेधडक अपारंपरिक कथनाने स्तिमित केलं. ह्या कादंबरीतल्या खोल, गंभीर उपरोधाने तसंच भावनिक व बौद्धिक स्तरांवर अस्वस्थ करून सोडणाऱ्या आशय व भाषेनेही त्यांना हलवून सोडलं. काहीतरी अभूतपूर्व घडलंय हे अशा वाचकांना कळलं होतं. नेमाडे ह्या संघर्षाचा आणि मनःस्थितीचा उपयोग करून घेतात (ह्याच संघर्षाचं व मनःस्थितीचं वर्णन सानेगुरुजींच्या स्वामींनी समकालीन समाजातील प्रत्येक महत्त्वाच्या बाबींवर प्रश्न उपस्थित करण्याच्या निमित्ताने वेगळ्या दृष्टिकोनातून केलं होतं): श्रद्धा, आचरण आणि शिक्षणातील तत्त्वांपासून केवळ रूढींवर आधारित साहित्यासह आयुष्यातल्या सर्व क्षेत्रांतल्या दांभिकतांपर्यंत सगळ्याचं परीक्षण केलं जातं. हे सगळं आणि शहरी भारताची, किंवा निदान पुण्यातल्या मराठी समाजाची, ह्याहूनही खूप अधिक आत्मसंतुष्टतेची अंगं हा नेमाडे ह्यांच्या आयुष्यात आणि कामात नेहमीच परीक्षणाचा विषय झाला.

त्यामुळे मराठी साहित्यात १९६३ सालात मोठा बदल घडून आला हे आपण प्रामाणिकपणे म्हणू शकतो. मात्र, १९६३ सालानंतरचं मराठी साहित्य १९६३ सालापूर्वीच्या मराठी साहित्याहून लक्षणीयरित्या वेगळं झालं आहे असं आपण तेवढ्याच प्रामाणिकपणाने म्हणू शकतो का? मला वाटतं, नाही. जे क्षेत्र केवळ अल्पसंख्य लेखकांवर नाही, तर बहुसंख्य वाचकांवरही अवलंबून आहे, त्या क्षेत्रात संपूर्ण बदल घडून येईल अशी अपेक्षा करणंही कदाचित अन्यायकारक आहे. सामान्य वाचकाचं स्वरूप गेल्या काही दशकांपासून नव्हे तर काही शतकांपासून तसंच आहे हे कदाचित अप्रिय सत्य आहे असं मला वाटतं. साहित्याच्या खरोखर महत्त्वपूर्ण अर्धशतकाबद्दल विचारल्या जाणाऱ्या काही प्रश्नांचा विचार करू : ह्या काळात परंपरा बदलून टाकणाऱ्या किती साहित्यकृती आल्या? किती साहित्यकृतींमुळे प्रत्येक गोष्ट कायमस्वरूपी 'बदलून' गेली? किती भावनाप्रधान आणि अवास्तववादी तसंच वास्तववादी कादंबऱ्या आज लिहिल्या जात आहेत? खऱ्या अर्थाने नवीन कलाकृती ती वापरत असलेल्या माध्यमामध्ये निश्चित व महत्त्वपूर्ण बदल घडवून आणते.

'*कोसला*'ला जे सांगायचं होतं, ते व्यक्त करण्यासाठी तिने मराठी भाषेचा उपयोग केला, उपयोजन केलं, पुन्हा उपयोजन केलं, ती नव्याने शोधली. सर्वात महत्त्वाचं म्हणजे हे सगळं आतून झालं होतं– दुसऱ्या भाषांकडे याचना करण्याच्या, त्यांच्याकडून उसनं घेण्याच्या किंवा त्याहून अधिक सोपं म्हणजे चोरण्याच्या प्रकारांतून हे झालं नव्हतं. '*कोसला*' आल्यानंतर गद्य फिक्शनमध्ये झालेल्या बदलाहून अधिक लक्षणीय बदल विसाव्या शतकाच्या मध्यात बाळ सीताराम मर्ढेकर ह्यांचं काव्य प्रकाशित झाल्यानंतर मराठी काव्यात घडला असा विचार करणाऱ्या काही अल्पसंख्यांमध्ये मी असेन. हा ह्याकडे बघण्याचा दृष्टिकोन अन्याय्य आहे का? कदाचित आहे. पण '*कोसला*'मध्ये जी काही सर्वांगीण अंतर्गत घुसळण होती, त्याची पुनरावृत्ती करणारं काहीच '*कोसला*'नंतर लिहिलं गेलं नाही. मराठी गद्य फिक्शनमध्ये मोलाची भर पडत राहिली. अत्यंत महत्त्वपूर्ण अशा दलित फिक्शनमधला आशय, दृष्टिकोन व भाषा कदाचित ह्यात सर्वाधिक महत्त्वाची असेल. दलितेतर फिक्शनमधला आशय व माध्यम तेवढं महत्त्वाचं नाही. आजच्या नवीन 'जागतिक खेड्या'तल्या तंत्रज्ञानाधारित समाजातल्या नेत्यांच्या नवीन नीतीमत्ताविषयक संकल्पनांमुळे एक दिवस अशा युगप्रवर्तक नवीन साहित्यकृतीचा जन्म होईल का, हा प्रश्न आहे.

'*कोसला*'मध्ये नवीन काय होतं ह्याबद्दल लिहिलेल्या गेलेल्या निबंधांची संपूर्ण पुस्तकं प्रकाशित झाली आहेत. तरीही कोणत्याही भाषेतल्या अशा साहित्यकृतींबाबत अधोरेखित करण्याजोगी एक बाब म्हणजे त्या कायम नवीन राहतात, असं मला वाटतं. वाचक जेव्हा ह्या साहित्यकृती प्रथम वाचतो, तेव्हाही त्या नवीन असतात आणि त्या पुन्हापुन्हा वाचल्या तरी त्याला नवीनच वाटतात. अलीकडेच नेमाडे ह्यांची निवड ज्ञानपीठ पुरस्कारासाठी झाली, तेव्हा '*कोसला*'चं हे विशेष स्थान आणि यश व ताजेपणा तसंच नेमाडेंनी साहित्यक्षेत्रात योगदानाच्या स्वरूपात दिलेल्या आणखी काही साहित्यकृती आणि त्यांच्या कामाची साहित्याची भाषांतरं

हे सगळं त्यांच्या पाठीशी ठामपणे उभं होतं. मात्र, आजच्या तरुणांमध्ये आयुष्याकडे बघण्याच्या वाढत्या बालीश आणि बेपर्वा दृष्टिकोनाहून '*कोसला*'चा नायक (किंवा अँटि-हिरो) पांडुरंग सांगवीकरचा दृष्टिकोन वेगळा आहे असं मला व्यक्तिशः वाटतं. भविष्यातल्या समजाचे संभाव्य नेते म्हणून उदयाला येत असलेल्या अनेक तरुणांना त्यांची भाषा, कुटुंबाची पार्श्वभूमी, सामाजिक किंवा सांस्कृतिक इतिहास ह्यांची अजिबात पर्वा नाही. ह्यातली उघडपणे जाणवणारी चूक म्हणजे, विश्वउत्पत्तीशास्त्रज्ञ जसे टीओई किंवा 'थिअरी फॉर एव्हरीथिंग'च्या शोधात असतात, तसे आजचे तरुण 'अल्टीमेट ॲप' किंवा 'ॲप फॉर एव्हरीथिंग'च्या शोधात आहेत. ह्या परिस्थितीत आणखी एखादी '*कोसला*' येण्याची आवश्यकता कदाचित आहे. आणखी एक '*कोसला*' यावी आणि तिने सध्या निर्मितीच्या प्रक्रियेतून जात असलेल्या समाजाच्या गाभ्याचं परीक्षण करावं हे गरजेचं आहे. उद्याच्या समाजाच्या सांस्कृतिक व भाषिक जडणघडणीचं परीक्षण होणं आवश्यक आहे.

तर आपण सानेगुरुजींच्या स्वामींनी पंचाहत्तर वर्षांपूर्वी उपस्थित केलेल्या सर्वात महत्त्वपूर्ण प्रश्नाकडे परत जाऊ; आजच्या तरुणाईच्या ओठांवर कोणती गाणी आहेत? कोणत्याही विषयावरच्या गृहितकाला सणसणीत अपवाद असतात हे मान्य करायला आणि ठासून सांगायला मी नेहमीच आणि सदैव तत्पर असतो- इतिहासाबद्दल, शास्त्रीय संगीताबद्दल, शास्त्रीय नृत्याबद्दल, कुटुंबाबद्दल, मूल्यांबद्दल, संस्कृतीबद्दल आस्था असलेले तरुण आजही आहेत. पण त्यांच्याबद्दल रास्त आदर बाळगूनही, सर्वसाधारणपणे लागू असलेला अस्वस्थ करणारा प्रश्न विचारल्याखेरीज गत्यंतर नाही. आजच्या तरुणाईच्या (आणि वाढत्या वयस्करांच्या) ओठांवर सध्या कोणती गाणी आहेत?

भालचंद्र नेमाडे ह्यांना प्रदान करण्यात आलेला राष्ट्रीय पुरस्कार आपल्याला आपला समाज, इतिहास, भविष्यकाळ तसंच भाषा, संस्कृती व साहित्य ह्यांचं अत्यंत प्रामाणिक परीक्षण करायला भाग पाडत नसेल, तर काहीतरी नक्कीच चुकत आहे. आपण 'स्वतंत्र' झालो तेव्हा म्हणजे सुमारे ७० वर्षांपूर्वी आपण कुठे होतो, आज आपण कुठे आहोत आणि सामाजिक, साहित्यिक आणि भाषिक निकषांवर आपण कुठे जात आहोत ह्याचं आज आपण सर्वांनी परीक्षण करणं आवश्यक आहे. अशा पुरस्काराच्या निमित्ताने आपण अभूतपूर्व पुनरावलोकन आणि विधायक तरीही कठोर आत्मपरीक्षण केलं पाहिजे. साहित्याच्या बाबतीत सांगायचं तर मराठी साहित्य जागतिक दर्जाचं आहे की नाही ह्याबद्दल मला व्यक्तिशः कधीच शंका नव्हती. ते अर्थातच जागतिक दर्जाचं आहे. आपल्याकडे आध्यात्मिक किंवा संत साहित्य सोडून दुसरं काहीही नसतं, तरीही कोणत्याही निकषावर ते जागतिक दर्जाचंच असतं. ह्या टप्प्यावर मराठी साहित्य जगातील अन्य साहित्यांच्या, उदाहरणार्थ, इंग्रजी साहित्याच्या तुलनेत किती महत्त्वाचं आहे. याचं मूल्यमापन करण्याची गरज नेमाडे ह्यांना वाटते, तशी मला वाटत नाही. तसंच इंग्रजी भाषा आणि त्या भाषेत लिहिलेलं साहित्य कमी महत्त्वाचं आहे हे त्यांना वाटत असलं, तरी मला तसं वाटत नाही. 'स्वतःला ओळखा' हा नेहमीच कोणीही कोणालाही देऊ शकत असलेला सर्वोत्तम सल्ला ठरतो. आणि पुढची '*कसोला*' केव्हा येणार ह्याचा विचार मी नक्कीच करत आहे. कारण, पहिली *कोसला* लिहिली गेली आणि प्रकाशित झाली, तेव्हा आपण जसे होतो, त्याहून आज खचितच वेगळे आहोत. मला इथे एक तथ्य अधोरेखित करायला किंवा आवश्यक तरतूद करायला आवडेल. ते म्हणजे मी जेव्हा मराठीचा विशिष्ट संदर्भ बोलताना देईन, तेव्हा भारतातल्या प्रत्येक महत्त्वपूर्ण किंवा प्रमुख किंवा जिवंत भाषेचं फेरमूल्यांकन, आजच्या अत्यंत प्रवाहीपणे तरीही अत्यंत मूलभूतरित्या बदलत असलेल्या समाजाच्या पार्श्वभूमीवर झालं पाहिजे.

भारतातल्या प्रत्येक संस्कृतीच्या किंवा उपसंस्कृतीच्या सर्वाधिक महत्त्वपूर्ण अंगांप्रमाणेच भाषादेखील, भाषेच्या माध्यमातून सुखदुःख व्यक्त करण्याची क्षमता लोकांमध्ये राहणारच नाही, अशा आकृतीबंधात रूपांतरित होत असलेल्या हायब्रिड भाषाप्रकारांच्या दलदलीत अडकण्याचा धोका आहे. आज असंख्य तरुणांच्या आणि वयस्कर लोकांच्या भाषेतून सखोल स्थानिक अभिव्यक्ती नाहीशा होत चालल्या असून त्या जागी निष्प्रभ, निकृष्ट आणि समर्थन न करण्याजोग्या 'उसन्या' अभिव्यक्ती येऊ लागल्या आहेत. मराठी, कन्नड आणि हिंदी भाषेतल्या अशा बालीश मिश्र भाषा प्रकारांचा अपवाद वगळता कदाचित भाषिक ओळख अशी उरणारच नाही.

महाराष्ट्राच्या साहित्यिक-सांस्कृतिक क्षितिजावर नेमाडे ह्यांचा उदय झाला. तेव्हा परिस्थिती अशी नक्कीच नव्हती. तरीही त्यांनी अनुभवाचं नावीन्य आणि दृष्टिकोन व्यक्त करण्यासाठी आपल्या मायबोलीतून संपूर्ण भाषा आकाराला आणली. विद्यापीठांमधल्या विभागप्रमुखांपासून ते तुमच्या घरी उत्पादनं विकण्यासाठी किंवा देणगी मागण्यासाठी येणाऱ्या तरुण मुलांपर्यंत कुणाशीही बोलून बघा, ते एका वेळी संपूर्ण मिनिटभरही एकाच भाषेत, अन्य भाषेतल्या शब्दांची भेसळ न करता बोलू शकत नाहीत हे तुमच्या लक्षात येईल. त्यांना एखादी अर्थपूर्ण कल्पना किंवा भावना मांडायची असेल तर, ते प्रामुख्याने इंग्रजी भाषेतून उसन्या

घेतलेल्या किंवा चोरलेल्या अभिव्यक्तीचा आणि शब्दांचा आधार घेतात. एवढंच नाही तर बॉलिवूडने प्रचलित केलेल्या हिंदीच्याही आश्रयाला जातात.

सानेगुरुजींच्या 'धडपडणारी मुले' या पुस्तकातल्या एका अत्यंत महत्त्वाच्या आणि चपखल लागू पडणाऱ्या एका भागाचा दाखला देऊन मी भाषणाला सुरुवात केली होती. '*कोसला*' प्रकाशित झाली तेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळून जेमतेम पंधरा वर्षं झाली होती. तरीही त्यापूर्वी लोकांना प्रेरणा देणारी तत्त्वे कुजण्याची प्रक्रिया सुरू झालेली होती. समकालीन समाजाच्या काही अत्यंत महत्त्वपूर्ण, आवश्यक अंगांचं परीक्षण केलं पाहिजे असं नेमाडे ह्यांना वाटणं त्यामुळे साहजिकच होतं.

आज मला सर्वाधिक चिंता वाटते ती आपल्या स्थानिक बोलींची. ह्या बोलींचं काय होतं आहे, इंग्रजी आणि हिंदी भाषांचं त्यांच्यावर आतून अतिक्रमण कसं होत आहे ही चिंता मला वाटते. त्यातून दोन समर्पक प्रश्न उभे राहतात. आपल्या तथाकथित मातृभाषेत संपूर्णपणे लिहू शकतील असे लोक आपल्याकडे असतील की नाही; आणि भाषा व साहित्य ह्यांच्यामध्ये भाषांतरकर्त्यांची, दुभाषांची भूमिका निभावू शकतील असे लोक आपल्याकडे असतील की नाही. आणखी एक महत्त्वाची गोष्ट इथे मांडली पाहिजे. कारण, माझ्या मते भाषांतराच्या कृतीच्या दृष्टीने ती गोष्ट मूलभूत आहे आणि माझ्या भाषांतराबद्दलच्या दृष्टिकोनाचा ती भाग आहे. मूळ भाषेवर खरोखर हुकुमत असलेल्यांसाठी भाषांतर केलं जात नाही. जे लोक मूळ वाचू शकतात आणि वाचतात त्यांचं भाषांतराने पूर्ण समाधान कधीही होऊ शकत नाही. हे भाषांतर करणाऱ्या प्रत्येकाला माहीत असतं. भाषांतर चांगलं असू शकेल किंवा निदान बरं असू शकेल, असं काही पटवून देणं कदाचित शक्य नाही. त्याऐवजी मूळ भाषा, मूळ संस्कृती आणि मूळ मजकूर माहीत नसलेल्यासाठीच भाषांतर केलं जातं. याहून वेगळं काही असेल असा आव आणण्यात काहीच अर्थ नाही. अर्थात लक्ष्यभाषा आणि मातृभाषा दोन्ही न समजणाऱ्यांनी भाषांतराचं मूल्यमापन नक्कीच करू नये.

तेव्हा आजचा प्रश्न एवढाच आहे, *कोसला* किंवा ककून ह्यापुढे बराच काळ टिकून राहील का किंवा ह्या कादंबऱ्या आणखी किती काळ टिकून राहतील? त्याहूनही अधिक व्यापक, अधिक महत्त्वाचा प्रश्न घोंघावत आहे. तो प्रश्न म्हणजे मराठी भाषा दीर्घकाळ टिकून राहील की नाही हा, नेमाडे ह्यांनी ह्या प्रश्नाकडे माझ्या दृष्टिकोनातून बघावं असं मला अत्यंत मनापासून आणि तळमळीने वाटतं.

भाषांतरातली भाषा (लक्ष्यभाषा) वाचताना लक्ष्यभाषेसारखीच वाटली पाहिजे आणि त्याहून महत्त्वाचं म्हणजे ती लक्ष्यभाषेसारखी ऐकू आली पाहिजे हे महत्त्वाचं तत्त्व आहे. बहुतेक भारतीय भाषांतरं ह्या तत्त्वाच्या कसोटीवर उतरत नाहीत. ह्या भाषांतरांमध्ये लक्ष्यभाषेकडे दुर्लक्ष झालेलं दिसतं, त्या भाषेच्या बोली व ऐकू येणाऱ्या अस्सल शैलीकडे तसंच तिच्या आकाराकडे फारसं लक्ष दिलं जात नाही. ही भाषांतरं मूळ भाषेतल्या वाचकांसाठीच असतात. हा अगदीच वेडगळ प्रकार आहे.

ह्या आणि अशा अनेक कारणांसाठी नेमाडे ह्यांचं साहित्य भाषांतरीत करणं ही आवश्यकता होती हे काम करण्याची इच्छा मी दोन दशकांहून जास्त काळ उराशी बाळगली होती. शेवटी मॅकमिलन (भारत) प्रकाशित करत असलेल्या भारतीय भाषांतल्या महत्त्वाच्या कादंबऱ्यांच्या मालिकेचा भाग म्हणून '*कोसला*'चं भाषांतर करण्याचं काम माझ्याकडे आलं. दोन दशकांपूर्वी घडलेले हे इतिहासातले अपघात होते.

सुदैवाने, त्या काळात किंवा त्यानंतर लगेचच भारतीय विद्यापीठातल्या इंग्रजी विभागांनी, अन्य भारतीय भाषांमध्ये काय होत आहे ह्याची माहिती आपल्या विद्यार्थ्यांना असावी, त्यांनी त्यातून शिकावं, याकडे लक्ष्य देण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे अनेक भारतीय विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांमध्ये भाषांतरांना किंवा भाषांतरित कृतींना स्थान मिळण्यास संथ गतीने पण निश्चितपणे सुरुवात झाली. ह्या प्रक्रियेत *कोसला* आणि तिच्या *ककून* ह्या इंग्रजी अनुवादाला महत्त्वाचं स्थान मिळालं. मी केलेलं भाषांतर दखलपात्र आहे की नाही ह्यावर मी काही बोलणं योग्य नाही, पण मूळ साहित्यकृती महाराष्ट्राबाहेर आणि भारताबाहेरही दखल घेतली जाण्यास पात्र आहे हे मात्र निश्चित.

आणखी एक मुद्दा. भाषांतराबद्दलची मूळ लेखकाची मतं आवश्यक किंवा महत्त्वपूर्ण असतात का? असू शकतात. किंवा उलटा विचार केला तर नसूही शकतात. माझ्या कामात नेमाडे ह्यांची ह्या विषयावरची मतं काय आहेत हे माझ्या दृष्टीने फार महत्त्वाचं नव्हतं. मूळ लेखनाची संवेदना, सूर, ओघ, वजन, भास, हेतू आणि ध्वनी भाषांतरात शक्य तेवढं उतरलं आहे की नाही ह्याबद्दल त्यांना काय वाटतं हे माझ्या दृष्टीने महत्त्वाचं होतं. हे भाषांतर लक्ष्यभाषेत वाचताना शक्य तेवढा 'नैसर्गिक' वाटत आहे की नाही ह्याबद्दलचं त्यांचं मत महत्त्वाचं होतं. म्हणूनच त्यांच्या मुंबई विद्यापीठातल्या घरात त्यांनी आणि मी एक आठवडा एकत्र घालवला. त्यांच्या अत्यंत उदार आणि अविश्रांत काम करणाऱ्या पत्नीच्या अगत्याचा लाभ घेत आम्ही प्रत्येक अक्षर, शब्द, वाक्प्रचार आणि वाक्यावर विचार केला आणि माझ्या अनुवादाच्या अंतिम मसुद्यावर काम केलं,

ते त्यावेळी '*ककून*' बाबत समाधानी होते आणि माझ्यासाठी त्यातच सगळं आलं. अन्य कोणी '*कोसला*'चं भाषांतर करू शकलं असतं का? अर्थातच करू शकलं असतं.

'*कोसला*'चं भाषांतर वेगळ्या पद्धतीने होऊ शकलं असतं का? नक्कीच होऊ शकलं असतं.

'*कोसला*'चं ह्याहून अधिक चांगलं भाषांतर होऊ शकलं असतं का? बहुतेक, हो.

मीच जरी आज '*कोसला*'चं भाषांतर केलं तर ते वेगळं असेल, कदाचित 'अधिक चांगलं' ही असेल. कारण मी आता स्वतःला थोडा अधिक चांगला ओळखू लागलो आहे. माझं मराठी आता किंचित अधिक चांगलं झालं आहे, ह्या कादंबरीने दिलेला 'सांस्कृतिक धक्का' आता विरलेला आहे. त्याचप्रमाणे भाषांतरासाठी कोणताही देवदत्त वगैरे आकृतीबंध उपयोगात आणला जात नाही तर तो नेहमीच मूळ मजकूर, भाषा, साहित्य व संस्कृतीचा अदमास असतो हे मला माहीत आहे. माझ्या इंग्रजीतल्या संसाधनांची कसोटी लागली का? त्यांची परीक्षा बघितली गेली का? '*कोसला*'चं '*ककून*'मध्ये रूपांतर करताना ह्या सगळ्यापुढे आव्हान उभं राहिलं का? हे सगळं नक्कीच झालं. तसं झालं नसतं, तर भाषांतराला काहीच मोल नव्हतं. ह्या भाषांतराने माझ्या स्वतःच्या आणि ऐतिहासिक अपेक्षा पूर्ण केल्या का? केल्या असाव्यात अशी आशा केवळ मी व्यक्त करू शकतो.

माझ्या भाषणाचा शेवट मी टी.एस. इलियट ह्यांच्या एका संदर्भाने करतो. समाजवादी नाटककार, समीक्षक आणि कार्यकर्ते विल्यम आर्चर ह्यांनी १९२१ मध्ये शेक्सपिअरवर एक पुस्तक लिहिलं. शेक्सपिअरने वास्तववादाची जी उंची गाठल्याचं समजलं जातं, तेवढ्या उंचीवर तो नव्हता, असा दावा त्यांनी ह्या पुस्तकात केला होता. त्यामागचं कारण? कारण त्याच्या साहित्यात जीवनाच्या 'पृष्ठभागां'चं प्रतिनिधित्व किंवा पुनर्निर्मिती होत नव्हती. आर्चर ह्यांच्या पुस्तकाची समीक्षा करताना, जीवनाचे पृष्ठभाग दाखवणं नाही, तर आतले स्तर उलगडून दाखवणं हे साहित्याचं काम आहे, असं मत टी.एस. एलियट ह्यांनी विषयावर व्यक्त केलं होतं. मी म्हणेन की, 'कोसला'च्या कथनासाठी भाषा किंवा सूर शोधताना भालचंद्र नेमाडे ह्यांनी जीवनाचा जो आतला स्तर उलगडून दाखवला, त्याची दखल घेण्याचीही त्यांच्या कोणत्याही समकालीन साहित्यिकाची इच्छा नव्हती, त्याची पुनर्निर्मिती करणं किंवा त्यावर टीका करणं तर खूपच दूरची गोष्ट होती.

---

# आजीचे स्मार्ट मनोगत

कोण म्हणते आजीची आता जवळ आली साठी
'साठी साठी' म्हणालात तर आजी देईल पाठीत काठी

आजी आता करते मॉर्निंग walk आणि हेवी ब्रेकफास्ट
आता मुळी ती करत नाही कुठलाही फास्ट

नातवंडा बरोबर पळापळ चालू असते नेहमी
नातवंड पळवतात चष्मा म्हणून नाही लावत चाळीशी

डायबेटीस, बीपी, गुडघेदुखी बद्दल शब्दही काढत नाही
सगळे आपलेच मित्र मैत्रिणी म्हणून कुरकुर करत नाही

आजी हल्ली निवडत नाही गहू तांदूळ, ॲण्ड पाले भाजी
सर्वांसाठी मस्त करते पिझ्झा ॲण्ड पावभाजी

आजी हल्ली वळत नाही सहाणेवर वाती
क्रिकेट मॅच बघत बघत दृढ करते नातीगोती



पार्लर मध्ये नित्य करते फेशिअल ॲण्ड लेटेस्ट हेअरकट
आजोबा जरी ओल्ड झाले तरी आजी रहाते नेहेमी स्मार्ट

आजची आजी ड्रेस, जीन्स, टी शर्ट सगळे enjoy करते छान
Young champs बरोबर गप्पा मारत रहाते मस्त 'चिरतरुण'

**संकलित सुहु**

**सुहिता मराठे,** संभाजीनगर
Mob ९१५८९ ८९९७५

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मुळे भारताचा विकास

• श्री. कालिदास बा. मराठे, गोवा भ्रमणध्वनी : ९४२३८८७२९०

**श्री.** कालिदास वा. मराठे माजी संचालक, राज्य शिक्षण संस्था गोवा. सध्या गोमंतक बालशिक्षण परिषदेचा सल्लागार, शिक्षणाविषयी चार पुस्तके व पाचवे पुस्तक 'वाचनाविषयी सर्व काही'. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील पहिला गट – वय वर्षे ३ ते ८ या साठीच्या पायाभूत शिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे महत्त्व आणि अंमलबजावणीबाबतचे उपाय या लेखात सांगितले आहेत.

चौतीस वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर २९ जुलै २०२० साली केंद्र सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरण जाहीर केले जे अनेकांच्या मते भारतकेंद्रीत, बालककेंद्रीत धोरण आहे. प्रा. कृष्णास्वामी कस्तुरीरंगन समितीने तयार केलेले हे धोरण २०४७ साली भारतीय स्वातंत्र्याच्या शतक महोत्सवी वर्षात विकसित भारताचे खऱ्या अर्थाने तोरण उभारेल यात शंका नाही.

परंतु माझ्यासारख्या शिक्षणक्षेत्रात काम केलेल्या आणि गेली काही वर्षे बालशिक्षणात काम करणाऱ्या कार्यकर्त्याला ३ ते १८ वयोगटासाठी सुचविलेल्या शालेय शिक्षणात ३ ते ८ वयोगटासाठी सुचविलेला पायाभूत शिक्षणाचा स्तर सर्वात महत्त्वाचा वाटतो.

परंतु दुर्दैवाने ऑक्टोबर २०२२ साली पायाभूत शिक्षणाचा अभ्यासक्रम तयार होऊनही अजून तो पूर्ण पाच वर्षांसाठी देशात कुठेही लागू करण्यात आला नाही.

पाच वर्षांचे पायाभूत शिक्षण हे एका छत्राखाली म्हणजेच शिक्षण खात्याने या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घ्यायला हवी असे मला वाटते. महिला आणि बालकल्याण समाजकल्याण खाते चालवित असलेल्या अंगणवाड्या, बालवाड्या पण शिक्षण खात्याकडे सोपविल्या पाहिजेत.

यापूर्वी या शिक्षणासाठी असलेले नामकरण – बालवाडी, अंगणवाडी, नर्सरी, केजी-१, केजी-२, बालवाटिका इत्यादि नावे जाऊन बालशाळा अथवा पायाभूत शिक्षण शाळा अशा पाट्या अशा शाळांवर दिसायला हव्या होत्या. पायाभूत शिक्षण वर्ष पहिले, दुसरे, तिसरे, चौथे आणि पाचवे अथवा बालशाळा वर्ष पहिले..... पाचवे अशा पाट्या लावायला हव्या होत्या. या शाळांत शिकविणाऱ्या खरे तर या मुलांना शिकायला मदत करणाऱ्या सेविकांना ताई संबोधन वापरायला सुरुवात करायला हवी.



या पायाभूत शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची प्रत अशा प्रत्येक शाळेत स्थानिक भाषेत उपलब्ध करायला हवी. या अभ्यासक्रमात बालशाळेच्या वेळा सकाळी ९।। ते २।। आणि त्यासाठी वेळापत्रक दिले आहे. त्यामुळे या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सकाळी १०.१५ ते १०.३० या वेळात पौष्टिक न्याहारी तर दुपारी १ ते १.४५ आरोग्यदायी जेवण देण्याचे सुचविण्यात आले आहे. अर्थात यासाठी त्या त्या राज्य सरकारनी व्यवस्था करायला हवी आहे. कस्तुरीरंगन समितीने यासाठी शिक्षणाच्या अंदाजपत्रकात ६ टक्के खर्चाची तरतूद करावी असे सुचविले आहे.

३ ते ८ वयोगटातील मुलांचे शिक्षण ही सरकारमधील सर्वच खात्यांनी जबाबदारी मानून आपल्या खात्याच्या अंदाजपत्रकात तरतूद केली व खालीलप्रमाणे जबाबदारी वाटून घेतल्यास अर्थपूर्ण शिक्षण या मुलांचे होईल असा मला विश्वास वाटतो.

१) शिक्षण खाते :- शिक्षण, शिक्षकांचे प्रशिक्षण पालक प्रशिक्षण, वाचन साहित्य.

२) महिला आणि बालकल्याण :- न्याहरी व जेवण

३) समाजकल्याण :- खेळणी, शैक्षणिक साहित्य.

४) आरोग्य :- नियमित आरोग्य तपासणी

५) कला आणि संस्कृती :- गायन-वादन-विविध कलांसाठी साहित्य

६) क्रीडा :- खेळासाठी साहित्य आणि साधने

७) शेतकी :- बागेसाठी साधने, बी-बियाणे

८) वन :- बावशाळेमागे वृक्षारोपण

९) सार्वजनिक बांधकाम :: बालशाळांसाठी इमारती, वेळच्या वेळी दुरुस्ती इत्यादी.

१०) पंचायत :: ग्राम बाल हक्क समिती, ग्राम शिक्षण समितीसाठी सहाय्य

११) वाहतूक :- बालशाळेत नेण्या-आणण्यासाठी आणि छोट्या सहलींसाठी वाहन व्यवस्था

१२) प्रसिद्धी :- बालशाळात चालणाऱ्या चांगल्या कामांना प्रसिद्धी.

वरील सर्व कामे वेळेवर आणि उत्तम व्हावीत यासाठी प्रत्येक खात्यात एक जबाबदार अधिकारी असेल आणि पहिली पाच वर्षे हे सर्व अधिकारी दर महिन्याला आढावा बैठक घेतील. शिक्षण सचिव अध्यक्षस्थानी तर शिक्षण खात्यातील अधिकारी सचिव असतील.

वर सुचविलेली योजना व्यवहार्य आहे आणि ती सरकारला मान्य होईल का हा लाखमोलाचा सवाल आहेच.

हे करायचे नसेल तर हे पायाभूत शिक्षण स्वायत्त मंडळाकडे सोपविणे योग्य होईल.

हे शिक्षण योग्य पद्धतीने दिल्यास पुढील शिक्षण घेण्यास विद्यार्थ्यांना काहीही त्रास होणार नाही. शिकवणी वर्गाची गरज लागणार नाही. विद्यार्थ्यांना आपल्या कलानुसार आपल्या आवडीचे शिक्षण घेता येईल असा आशावाद व्यक्त केला जातोय.

यासाठी खालील गोष्टी त्वरित करण्याची गरज आहे असे मला वाटते.

१) या शाळांत काम करणाऱ्या ताई-दादांचे दर महिन्याला एक दिवसाचे प्रशिक्षण.

२) अभ्यासक्रमात सांगितलेल्या गोष्टीप्रमाणे काम चालते की नाही हे पाहण्यासाठी या विभागात काम करणाऱ्या पर्यवेक्षकांनी महिन्याला किमान एक भेट देऊन अडचणी समजावून घेणे व त्या सोडविण्यासाठी साहाय्य करणे,

३) ३ ते ८ वयोगटातील मुलांच्या पालकांसाठी (आई आणि वडिल दोघांसाठी) 'मूल शिकत कसं!' या विषयावर एक दिवसाची कार्यशाळा शाळासमूह पातळीवर आयोजित करणे. कार्यशाळेच्या वेळी पालकांना उपयोगी पडणाऱ्या मासिक-पुस्तकांचे प्रदर्शन व ते पाहण्यासाठी वेळ देण्याचे नियोजन.

४) सरकारने प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात एक आदर्श बालशाळा ज्यामध्ये प्रत्येक वर्षासाठी खोली, जेवणघर, स्वच्छतागृहे, ग्रंथालय, क्रीडांगण, बाग इत्यादी सोयी असतील. तसेच तालुक्याच्या ठिकाणी ३ ते १८ वयोगटासाठी एक शाळा ज्यामध्ये सर्व प्रकारच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येईल अशा सोयीसुविधा असणारी.

५) खाजगी शिक्षण संस्थांना बालशाळा स्थानिक भाषेतच चालविण्यासाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्यासाठीची योजना सरकारने त्वरित तयार करावी.

६) या बालशाळांत काम करणाऱ्या ताई-दादांना त्यांच्या कामानुसार योग्य वेतन देण्याची व्यवस्था शासनाने करायला हवी.

बालशिक्षणाचे गांधीजी म्हणविले जाणारे गिजुभाई बधेका आणि त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या भारताच्या मारिया मॉंटेसरी - ताराबाई मोडक यांनी बालशिक्षणासाठी जे काम केले आहे त्याचा अभ्यास पण या शाळांसाठी काम करणाऱ्या सर्वांनी करायला हवा असे मला सुचवावेसे वाटते.

गिजुभाईंनी सन १९३८ साली बालशाळांत काय असावे आणि काय असू नये अशा एकवीस गोष्टींची यादी दिली होती तर ताराबाई मोडक यांनी आपल्या गीतातून या शाळांत कसे शिक्षण द्यावे ते सुचविले होते. ती कविता पायाभूत शिक्षणाचे ध्येयगीत असावे असे मला वाटते. ज्याचा इंग्रजी । कोकणी अनुवाद उपलब्ध आहे. ती कविता देऊन मी थांबतो. बालकांना हसू द्या, खेळू द्या, हसत खेळत शिकू द्या.

गाऊ द्या, नाचू द्या, गाता, नाचता शिकू द्या.<br>
गोष्टी ऐकू द्या, सांगू द्या, ऐकत, सांगत शिकू द्या.<br>
तोडू द्या, जोडू द्या, तोडत जोडत शिकू द्या.<br>
हिंडू द्या, पाहू द्या, हिंडत पाहत शिकू द्या.<br>
कल्पना विश्वात रमू द्या, कल्पना करत शिकू द्या.<br>
आणि नाना प्रश्न विचारू द्या, प्रश्न विचारत विचारत शिकू द्या.

(ताराबाई मोडक यांच्या 'सहज शिक्षण' पुस्तकातून)

♦

# परीटघडीचे 'व्हाइट कॉलर' दरोडेखोर

• शुभदा दीपक मराठे, गोवा

भ्रमणध्वनी : ९४२३५२४७७५

सकाळी सकाळी वर्तमानपत्र उघडले रे उघडले की कोटींच्या हिशोबात पैसा हडप केल्याची बातमी ठकसेनांच्या फोटोसहित वाचायला मिळते. कोणी सूत्रधार, कोणी मध्यस्थ, कोणी सरकारी अधिकारी आणि बळीचा बकरा बनलेला सामान्य माणूस, ज्याला सर्व बाजूंनी सुरक्षित अशी सरकारी नोकरीच हवी असते. ती एकदा मिळाली की आयुष्याचे सोने झाले असे त्याला वाटते. मग काय सकाळी उठला ऑफिसला गेला, संध्याकाळी घरी आला. डोक्याला ताप नाही की शरीराला कष्ट नाही. सगळेच कसे सुरक्षित, सुखी आणि चैनीत चाललेले असते.

पण ही सरकारी नोकरी मिळवायची कशी? त्यासाठी थोडे कष्ट घ्यावे लागतात. कष्टही साधेसुधे नाहीत तर नोकरी देणाऱ्या एजंटला पकडण्यापासून ते त्याला हवे तेवढे त्याचे हात ओले करण्यापर्यंत मजल मारावी लागते. ही रक्कम काही साधीसुधी नसते. लाखोंच्या घरात, कधी कधी एक पाऊल पुढे कोटीच्या घरातही ती असते. जितकी नोकरी वजनी तितकी तितकीच थैलीही वजनी असावी लागते.

अशा दलालांच्या नजरेत गरजू माणूस सापडतो. दलाल असे सावज अचूक हेरतात आणि पैसे उकळतात. मौज मजा करतात. व्यसनेही असतातच. अधूनमधून एखाद्याला नोकरीही लावून देतात. मग त्यांची पत वाढते. गरजू माणसे इथेच फसतात. बरेचसे लोक पैसे घालवून बसतात आणि कर्जबाजारी होतात. अशा बऱ्याच जणांना चुना लागल्यानंतर अगदीच न राहवून त्यातला एखादाच तक्रार करण्याचे धारिष्ट करतो आणि बिंग फुटते. मग अधिकृतरीत्या धरपकड सुरू होते. अर्थात आधी या गोष्टी मान्यवरांना किंवा सुरक्षा यंत्रणेला शासनाला माहीत नसतात असे मुळीच नाही. कारण तेही अधून मधून आपले हात ओले करून घेत असल्याशिवाय दलालांचे मोकाट फिरणे संभवत नाही. प्रकरण अंगावर शेकेपर्यंत आळी मिळी गुपचिळी साधली जाते, असे हे षडयंत्र.

एका बाजूला गरिबी वाढली आहे, तरुण बेकार आहेत, असा सारखा आरडाओरडा पेपरच्या माध्यमातून चालू असतो. विरोधी पक्षही हेच मुद्दे घेऊन भांडत असतो. पैसा नाही तर नोकरी मिळवण्यासाठी द्यावे लागणारे लाखो रुपये कुठून आणतात, हाही एक प्रश्नच आहे.

मला आठवते सुमारे ४०, ४५ वर्षांपूर्वी सरकारी नोकऱ्या देताना काही निकषांचे पालन केले जाई. यात पहिल्या पन्नासजणांचे मेरिट लिस्ट असायचे. त्यांच्या मुलाखती घेऊन रिक्त जागेप्रमाणे नोकरी दिली जाई. नंतर पुढील उमेदवारांना संधी दिली जात असे. म्हणजेच गुणवत्तेला मान दिला जाई. त्यानंतरच बाकीच्यांसाठी महनीय व्यक्तीच्या शब्दाचा मान राखून सामावून घेतले जाई. अशा व्यक्ती, नोकरदार माणसे गुणवत्तेला मान दिल्यामुळे प्रामाणिकपणे आणि नीटनेटके काम करीत असत. माणसे माणसांना माणूस या नात्याने ओळखत होती. समोरच्याचा आदर करायची रीत होती. निदान माणसे एकमेकांना ओळख तरी दाखवत होती. नातीगोती, शेजारपाजार याची सर्वांना जाण होती. आज या गोष्टी हळूहळू कमी होत तडीपार झाल्या आहेत. उरल्यासुरल्या नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.



तेव्हा शिकलेली माणसेही मर्यादित होती. आता प्रत्येक जण शिकलेला आहे, प्रत्येकाला सरकारी नोकरी हवी आहे. त्यामुळे अधूनमधून अशा गोष्टी कानावर येत असत. पण एवढ्या मोठ्या प्रमाणात षडयंत्र चालू असेल आणि त्यातून फसवणूक होत असेल असे कधीच वाटले नव्हते.

आता मात्र विचित्र, भयानक सत्य समोर येत आहे. दिवसेंदिवस त्याचे स्वरूप अधिकच तीव्र होत चालले आहे.

अजून काय काय ऐकायला, वाचायला मिळेल, हे सांगता येत नाही. समाजाच्या नैतिकतेची झालेली प्रचंड घसरण पाहवतही नाही आणि सहन तर होतच नाही. माणसे अक्षरश: विकली जाताना पाहून मन विषण्ण होते. गोवा मुक्तीसाठी रक्त सांडलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना, त्यांच्या कुटुंबीयांना काय वाटेल याचा थोडा थोडा जरी विचार केला गेला असता तर?

गोवा मुक्तीनंतर प्रत्येक नागरिक स्वाभिमानाने आनंदाने स्वकर्तृत्वाने आपले आणि समाजाचे रक्षण आणि वर्धन करेल अशी माफक अपेक्षा त्यांनी ठेवली असावी. पण ही अपेक्षा पूर्ण करण्याचे भाग्य आमच्या नशिबी नाही. उलट दुसऱ्यांना लुबाडून आपण श्रीमंत कसा होऊ, याकडेच बहुतेकांचे लक्ष लागले आहे. पैसा श्रेष्ठ. पैशापुढे नातीगोती, आपली परकी सगळे सगळे विसरून आपण लिओ टॉलस्टॉय यांच्या 'हाउ मच लॅंड डज अ मॅन नीड?' या लघुकथेतल्या त्या पहोमसारखे धावत सुटलो आहोत. त्या कथेतला पहोम, जितके जास्त जोरात धावत जाऊन परत येऊ तितकी जमीन आपली होईल या आशेने सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत धाव धाव धावतो आणि शेवटी थकून मरतो. जिच्यासाठी धावतो, ती जमीन काही त्याला अतिस्वार्थामुळे उपभोगता येत नाही.

माणसे केवळ मी आणि माझा स्वार्थ यालाच कवटाळून बसली आहेत आणि या स्वार्थापोटी मिळेल त्याला लुबाडीत आहेत. यात महिलांचे वर्चस्व आहे. आम्हा महिलांना ३३ टक्के आरक्षण देऊन पुढे आणण्यासाठी, त्यांच्या कर्तृत्वशक्तीला वाव देण्यासाठी सरकार आणि समाज प्रयत्नशील आहे. 'महिलांवर अन्याय होतो', 'महिला खूप सहन करतात', 'त्या खूप काही करू शकतात, पण त्यांना संधी दिली जात नाही', 'संधी द्या, त्या संधीचे सोने करतील', अशी अनेक वाक्ये कानावर पडतात. 'कॅश फॉर जॉब' घोटाळ्यांत महिलांचा सहभाग पाहता, ही वाक्ये हास्यास्पद वाटतात. या इथे प्रामाणिक महिलांची क्षमा मागून म्हणावेसे वाटते की, निसर्गाने दिलेल्या आकर्षकपणाचा, रूपाचा, बुद्धिमत्तेचा आणि स्त्रीत्वाचा गैरफायदा घेत इतरांना फसवून कोट्यवधी कमवण्याचे काम महिला करतात. गरीब जनसामान्यांना नोकरी, प्लॉट, फ्लॅट, बिझनेस इत्यादींची आमिषे दाखवून त्यांच्या जिवावर कोट्यधीश होण्याची स्वप्ने साकार करतात. संपत्ती कमवावी पण ती कमावण्याचा मार्ग नेहमीच प्रामाणिक व चांगला असला पाहिजे.

निसर्गनियमानुसार जन्म, मृत्यू आणि इहलोकाचा वारसा सर्व प्राणिमात्रांना ईश्वरेच्छेने मिळाला आहे. जन्माला आलेल्या सजीवाला जगण्यासाठी धडपड ही करावीच लागते. माणूस वगळता इतर प्राणी भूक लागली की अन्नाच्या शोधात फिरतात, अन्न मिळवतात आणि खातात. ते कुठेही अन्न साठवून ठेवत नाहीत, धन तर नाहीच नाही. पण सगळ्या सजीवांचा मुकुटमणी मानव प्राणी आहे त्याने आपली इतकी प्रगती केली आहे की अन्नधान्यापेक्षा त्याला पैसा, धन हेच सर्वश्रेष्ठ वाटते व ते मिळवण्याचे अनेक मार्ग त्याच्यापाशी आहेत. काही खडतर, काही सोपे, काही कष्टसाध्य तर काही विनाकष्टाचे. मार्ग कोणताही निवडला तरी त्यात प्रामाणिकपणा, सचोटी यांना पर्याय नाही. दुर्दैवाने आज चित्र फार उफराटे आणि निराशाजनकच दिसत आहे. जंगलवाटेवर, आडमार्गाला राहून शस्त्राची भीती दाखवून लुटणाऱ्यांना आपण 'दरोडेखोर' म्हणतो. मग, या अशा नोकरीचे आमिष दाखवून लुबाडणाऱ्या परीटघडीच्या 'व्हाइट कॉलर' महिलांना व लोकांना काय म्हणायचे? त्यांनी अगदी योजनाबद्ध रीतीने घातलेले हे दरोडेच नव्हेत का? ♦

## लयभारी आनंदराव

दिल दोस्ती दुनियादारी,
ग्रुप की खासियत न्यारी.
सर्व जेष्ठ सदस्य,
आणि आनंदराव लयभारी.

फ्रेंड फिलॉंसॉफर गाईड जैसी,
सदस्यों में आपसी साझेदारी.
सगळ्यांच्या ह्दयात माणुसकी
रूजवणारे आनंदराव लयभारी.

सभी को आदर - सम्मान,
स्त्रियों को विशेष स्थान.
ग्रुपच्या ह्या वैशिष्ट्यासाठी
प्रेरक आनंदराव लयभारी.


नही गीले-शिकवे, मनमुटाव
आपसी भाईचारा स्थायीभाव.
ग्रुपमध्ये सदैव प्रेमभाव,
सांभाळणारे लयभारी आनंदराव

समवयस्कों से हसीमजाक,
बालकों को हमेशा लाड प्यार.
तरुण तरुणींना प्रोत्साहन,
सर्वांचे लाडके लयभारी आनंदराव.

**- संजय उवाच**

# सहवेदना

## ज्येष्ठ गायक संजय मराठे यांचे निधन



संगीत भुषण पंडित राम मराठे यांचे ज्येष्ठ सुपुत्र गायक व हार्मोनियम ऑर्गन वादक पंडित संजय राम मराठे यांचे रविवारी १५ डिसेंबर २०२४ रोजी रात्री दुःखद निधन झाले. हृदयविकाराच्या तीव्र झटका आल्याने त्यांना ठाण्यातील खाजगी रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, उपचारा दरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. मृत्युसमयी ते ६८ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात युवा तडफदार गायक भाग्गेश मराठे, प्राजक्ता मराठे, पत्नी, सूना नातवंडे असा परिवार आहे. संगीत भूषण पंडित राम मराठे यांच्या नुकत्याच जन्मशताब्दी निमित्त वर्षभर अनेक कार्यक्रमात त्यांचा मुख्य सहभाग होता. आपले धाकटे बंधू गायक मुकुंद मराठे यांच्यासह त्यांनी संगीत मंदारमाला हे संगीत नाटक जन्मशताब्दी वर्षात साकारले होते आणि आज देखील त्याचे प्रयोग जोरदार चालू आहेत. त्यांचे अंत्यविधी सोमवार दिनांक १६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजता जवाहर बाग स्मशानभूमीत झाला.



---



श्री. गोविंद मराठे, मधुनिवास माळ (वय ६५ वर्षे) मालक, मराठे मिल्क प्रोडक्ट्स (Marathe Milk Products) यांचे सोमवार १६ डिसेंबर २०२४ रोजी स्वगृही निधन झाले.

श्री. एन. कृष्ण भट (दिवंगत गोविंद मराठे यांचे स्नेही) यांनी सांगितलेल्या आठवणींचा अनुवाद–

गोविंदरावांनी आपली दुसऱ्या ठिकाणाची नोकरी सोडली व आपल्या मूळगावी 'माळ'ला परतले. आपल्या शेतीवाडी बरोबरच दुग्ध व्यवसायाला सुरुवात केली. बजगोळी या गावातल्या दुग्धसंस्थेत टेम्पोमार्फत दुध पाठवते वेळी एक दिवस टेम्पो चुकला अन् सगळं दुध घरीच राहिलं. ते सर्व दुध आटवून साखर मिसळून त्याचे लाडू बनवले व ते पुन्हा बजगोळीतील एका बेकरीत विक्रीस ठेवले. उत्तम चवीचे हे पेढे ग्राहकांना आवडल्याने मागणी वाढत राहिली.

पुढील वाटचालीत दिवंगत गोविंदरावांनी स्वतःच पेढे डब्यात भरून बाजारात प्रत्यक्ष विक्री करतांना 'मराठे पेढे' असं नामकरण केले. डबे कापडाच्या पिशवीत घालून स्वतः गावोगावी जाऊन विक्री केली. नंतर याबरोबरच अनेक चविष्ट पदार्थ बनवून विकू लागले. कर्नाटकातच नव्हे तर इतर राज्याबरोबर परदेशातही 'मराठे मिल्क प्रोडक्ट्स' प्रसिद्ध आहेत.

फक्त उद्योजकच नव्हे तर सहृदयी, सामाजिक कार्यक्रमांची आवड असलेले दिवंगत गोविंदराव २००९च्या 'कारकळ'च्या 'अखिल भारतीय मराठे संमेलना'चे खांदे कार्यकर्ते होते. त्यांची परंपरा पुढे चालविणारे त्यांचे सुपुत्र श्री. नागभूषण आपल्या कणकवली संमेलनात सहभागी झाले होते.

**डॉ. (सौ). अपुर्वा अरुण मराठे,**
फोंडा गोवा.

# विनयशील वाटचालीची अखेर...

◆ राजेंद्र पाटणकर

***विनय वसंत मराठे, मराठे इन्फोटेक, ठाणे यांचे आकस्मिक निधन झाल्यानंतर त्यांच्या वर लिहिला गेलेला लेख.***

माणसाच्या जगण्याला एक वेगळी मजा आहे असं म्हणतात, कारण मानवी जीवन हे पूर्णतः अनिश्चिततेने भरलेलं असतं. भविष्यातल्या कुठल्याच गोष्टीबद्दल आपण वर्तमानात खात्री देऊ शकत नाही. खरंतर माणसाला त्याच्या आयुष्यात खूप काही गोष्टी करायच्या असतात. प्रत्यक्षात तो जे करतो ते त्याला करायचं असतं का? या प्रश्नाचं उत्तर विचारलं तर थेट त्याच्या मनापर्यंत जावं लागेल.

विनय वसंत मराठे या माणसाच्या बाबतीतही असंच आहे. वडिलांनी सुरू केलेल्या एका मोठ्या उद्योगाची धुरा अगदी तरुण वयात हातात घेतल्यानंतर वडिलांच्या आदर्श मार्गाने वाटचाल करतानाच त्या उद्योगाला शिखरावर नेत विनय मराठे यांनी या क्षेत्रातील आपल्या सर्व सहकाऱ्यांसमवेत त्या उद्योगालाच एक वेगळा आयाम मिळवून दिला. उद्योगातील सर्व सहकारी, अधिकारी, कर्मचारी यांच्याशी अत्यंत सलोख्याचे संबंध ठेवत जणू त्यांचा महाराष्ट्र इंडस्ट्रीज डिरेक्टरी हा एक उद्योग नव्हे तर एक कुटुंब बनवलं. अर्थातच विनय मराठे त्याचे कुटुंब प्रमुख! पण हे वर्तमान स्वीकारतानाच या माणसाच्या अंतर्मनात डोकावल्यावर लक्षात येतं की अगदी तरुण वयात नाट्यकलेकडे असणारा त्यांचा ओढा त्यांना अखेरपर्यंत अस्वस्थ करत राहिला. अगदी तरुण वयात नाट्यकलेत स्वतःचं वेगळं स्थान निर्माण करण्याची मनीषा मनात निर्माण झाल्यानंतर त्यांना संधी मिळाली ती व्यावसायिक रंगभूमीचे अनभिषिक्त सम्राट डॉक्टर काशिनाथ घाणेकर यांच्या समवेत काम करण्याची! अर्थात एवढ्या दिव्य सूर्यापुढे या अभिनेत्याच्या चमकण्याला तेव्हा तरी फारसा वाव मिळाला नव्हता. पण घरातले संस्कार आणि स्वतःची मानसिकता यामुळेच स्वतःला काबुत ठेवत, दोन अडीच तासाच्या नाटक सादरीकरणाव्यतिरिक्त या क्षेत्रातले भले-बुरे अनुभव म्हणजे आपलं जीवन होऊ शकत नाही याची जाणीव झाल्याने स्वतःहून या क्षेत्रापासून दूर होत त्यांनी वडिलांच्या उद्योगात स्वतःला स्थिरस्थावर केलं. नाट्यकलेत मिळालेल्या या प्रशिक्षणाच्या संधीचा त्यांनी आपल्या वैयक्तिक जीवनात नेमका काय उपयोग केला हे आपल्याला कळलं तेव्हा दाद द्यायलाही आपलं मन तयार होत नव्हतं. ज्यांच्या रंगमंचावरच्या एन्ट्रीला टाळ्यांचा कडकडाट व्हायचा, त्या रंगभूमीच्या सम्राटाकडून त्यांनी अभिनयाची जी नकळत एकलव्यी दीक्षा घेतली, त्या परिणामस्वरूप त्यांनी या जगाच्या रंगभूमीवरून घेतलेली एक्झिट मात्र तेवढीच विस्मयकारक आणि चटका लावणारी. एखादी कलाकृती जेव्हा रसिकांची दाद मिळवून जाते तेव्हा ती थोर असते असं निर्विवादपणे म्हटलं जातं. पण त्याही पुढे जात एखादी कलाकृती जेव्हा रसिकांना दाद देण्यापूर्वीच दिग्मूड करून टाकते तेव्हा ती कलाकृती सर्वार्थाने थोर असते. आणि म्हणूनच विनय मराठे यांची ही इहलोकयात्रेची समाप्ती विलक्षण चटका लावणारी आणि अनपेक्षितच!

विचारातला निर्धार, कलाप्रेमी रसिक, उद्यमतेचं शिखर आणि प्रेम, जिव्हाळा आणि सहमतीचं पालकत्व या गुणांच्या आधारावरची ही 'विनयशील वाटचाल' अचानक थांबणं फारच क्लेशदायक!

ईश्वर त्यांच्या आत्म्याला सद्गती देवो हीच प्रार्थना! ◆

**इ-मेल : hitguj@marathepratishthan.org • वेबसाईट : www.marathepratishthan.org**